रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९ । अंक ९२ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




रायगड, सोमवार, दि. ८ सप्टेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

## सुकेळी खिंडीत बस-टेम्पोचा अपघात



**नागोठणे :** मुंबई-गोवा महामार्गावरील अपघातांची मालिका ही काही केल्या संपायचे नावच घेत नसून जणू काही या महामार्गाला अपघातांचे ग्रहण लागले आहे. याच मार्गावरील अपघातग्रस्त अशी खिंडीची ओळख असलेल्या सुकेळी खिंडीच्या जवळच असलेल्या खैरवाडी गावाजवळ आयसर टेम्पो व एसटी बस यांच्यामध्ये रविवार (दि. ७) रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. याबाबतीत पान २ वर

## वेधक

### व्यावसायिकाची आत्महत्या

**महाड :** तालुक्यातील बिरवाडी शहर बाजारपेठेतील एका ४२ वर्षीय व्यावसायिकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना नुकतीच घडली आहे. संतोष तानाजी जाधव असे आत्महत्या करणाऱ्या इसमाचे नाव असून, तो मूळ खरवली, बिरवाडी येथील रहिवासी होता. मयत संतोष जाधव याचं बिरवाडी बाजारपेठेत विक्रम स्टॅन्डशेजारी भांड्याचे दुकान होते. श्री कृपा भांडी दुकान असे या दुकानाचे नाव असून, संतोषने गणेशोत्सवामध्ये गणेशमूर्ती विक्रीचा व्यवसायदेखील याच दुकानांमध्ये केला होता. दि. ५ सप्टेंबर रोजी संतोषने स्वतः च्या मालकीचे असलेल्या दुकानातील सिलिंग फॅनला नायलॉन दोरीच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. सर्व धंदा पान २ वर

### विजेच्या धक्क्याने सात जनावरे दगावली

**म्हसळा :** तालुक्यातील पाष्टी येथील दुग्ध व्यवसाय करणारे शेतकरी जीवन गोविंद लाड यांच्या पाच गायी आणि दोन बैल जंगलात चरण्यासाठी गेले असता सायंकाळी घराकडे परतत असताना केळीची गोठण येथे वीज वाहक तार तुटून पडल्याने गुरांना विजेचा शॉक लागून ती जागीच गतप्राण झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. ही घटना ४ सप्टेंबर रोजी सायंकाळी उशिरा घडली असल्याचे सांगण्यात आले. ५ सप्टेंबर रोजी सकाळी गायी व बैल गोठ्यात आले नाहीत म्हणून शेतकरी जीवन लाड शोध घेत असताना त्यांना त्यांची सर्व जनावरे पाष्टी-मोरवणे गावाच्या हद्दीत केळीची गोठण येथे पान २ वर

### शॉक लागून बैलाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** महावितरणच्या तुटलेल्या केबलचा शॉक लागल्याने आंबिवली येथील शेतकऱ्याच्या बैलाचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी शेतकऱ्याला नुकसानभरपाई मिळण्याची मागणी केली जात आहे.बाळाराम शंकर पाटील हे आंबिवली येथे राहात असून, त्यांच्या शेतीच्या परिसरात एका विद्युत खांबावरील केबल तुटली होती. त्यांनी याबाबत महावितरणच्या वायरमनला चार ते पाच दिवसांपूर्वी कळवले होते. मात्र, कोणीही त्या ठिकाणी काम करण्यात आले नसल्याचा आरोप पाटील यांनी केला. सहा सप्टेंबर रोजी सकाळी त्या तुटलेल्या केबलचा बैलाला स्पर्श झाल्याने यात बैलाचा मृत्यू झाला. पान २ वर

# श्रीसदस्यांकडून ६७४२ टन निर्माल्य गोळा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईतील गणेशोत्सव उत्साहात साजरा करताना पर्यावरण रक्षणाचे भान ठेवत, डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्यावतीने निर्माल्य संकलन व खतनिर्मिती हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. प्रतिष्ठानच्या पाच हजार श्रीसदस्यांनी गिरगाव आणि जुहू चौपाट्यांवर एकूण ६७४२ टन निर्माल्य गोळा करत स्वच्छतेचा संदेश दिला.

हा उपक्रम पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी आणि रायगडभूषण डॉ. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पान २ वर

डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचा पर्यावरणपूरक उपक्रम



### खतनिर्मितीसाठी यंत्रसज्जता

गिरगाव आणि जुहू चौपाटीवरच खतनिर्माण करणारी यंत्रे बसविण्यात आली होती. श्रीसदस्यांनी गोळा केलेल्या निर्माल्यापैकी फक्त फुले आणि पाने यंत्रामध्ये टाकली. हारांतील धागे, दोरे वेगळे करण्यात आले. यंत्रामार्फत फुलांचा चुरा करून तो गोण्यांमध्ये साठवण्यात आला. त्यापासून गांडूळ खताची निर्मिती केली जाणार आहे. हे सेंद्रिय खत, प्रतिष्ठानच्या विविध वृक्षारोपण उपक्रमांमध्ये वापरले जाणार आहे.

## मुरुड किनारी १४९ मूर्तींचे पुनर्विसर्जन

**मुरुड जंजिरा :** मुरुड व मजगाव अशा सर्वच ठिकाणी दहा दिवसांच्या बाप्पांचे शनिवारी जल्लोषात विसर्जन पार पडले. विसर्जन सोहळा साजरा झाला, पण विसर्जनाच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे रविवारी सकाळी मुरुड, पान २ वर



# चाकरमान्यांची कोंडी

- वाहतूक कोंडीमुळे नागरिक हैराण
- गर्दी वाढल्याने कोकण रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले





**। मुंबई । प्रतिनिधी ।**

दहा दिवसांच्या गणपती बाप्पांचे विसर्जनकरुन मुंबईकडे निघालेल्या गणेशभक्तांचे परतीच्या प्रवासात मोठे हाल झाले. चार ते पाच तास वाहतूक कोंडीत अडकलेल्याप्रवाशांनावातानुकूलित गाडीमध्येही घाम फुटला. त्याचप्रमाणे कोकण रेल्वे मार्गावर प्रवाशांची संख्या प्रचंड वाढली आहे. परंतु, एकाच मार्गिकेमुळे आणि दररोज धावणाऱ्या ४० ते ४५ गाड्यांमुळे रेल्वेचे वेळापत्रक पूर्णपणे कोलमडले आहे. यामुळे प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे पळस्पे ते नागोठणेपर्यंत रुंदीकरण होऊनही मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरचा वाहतूक कोंडीचा विळखा दूर होत नाही. दहा दिवसांच्या बाप्पाला निरोप देऊन चाकरमानी मुंबईच्या दिशेने निघाले. चाकरमानी आणि प्रवासी त्यांची चारचाकी, दुचाकी वाहने, खासगी प्रवासी वाहने, एसटी बसेस व अवजड मालवाहू वाहनांची तुफान गर्दीच महामार्गावर असून, महामार्गाच्या दुरवस्थेमुळे वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागला. चार-पाच तास गाडीत बसून राहावे लागल्याने प्रवाशांनी संताप व्यक्त केला. या वाहतूक कोंडीत ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि रुग्णांचे हाल झाले. महामार्गावरील खड्ड्यांमुळे वाहतुकीचे तीनतेराच वाजले होते. वाहतूक पोलिसांची कोंडी सोडविताना चांगलीच दमछाक झाल्याचे दिसून येत होते.

दरम्यान, कोकण रेल्वे मार्गावर दुहेरी मार्गिका नसल्यामुळे गाड्यांना अनेक ठिकाणी थांबवून दुसऱ्या गाड्यांना मार्ग द्यावा लागत आहे. विशेषतः तामिळनाडू, केरळ, गुजरात, दिल्ली, राजस्थान, पंजाब यांसारख्या लांब पल्ल्याच्या गाड्यांना प्राधान्य दिले जात आहे. याचा थेट परिणाम कोकणातील गणेशभक्तांसाठी सोडलेल्या विशेष गाड्यांवर होत आहे. या गाड्यांना अनेक लहान स्थानकांवर थांबवून ठेवावे लागत असल्याने त्या अनेक तास उशिराने धावत आहेत.

गणेशोत्सवासाठी कोकणात आलेल्या ३६२ पान २ वर

### प्रवास वेटिंगवरच

कोकण रेल्वे मार्गावर धावणाऱ्या गाड्यांचे कन्फर्म तिकीट भेटणे म्हणजे एक दिव्यच मानावे लागेल, अशी परिस्थिती सध्या आहे. कोटा कमी, त्यात दलालांचा सुळसुळात त्यामुळे सामान्य प्रवाशांना सहजासहजी आरक्षित तिकीट उपलब्ध होत नाही. त्यामुळे हा परतीचा प्रवस त्यांना सामान्य कोचमध्ये करावा लागत आहे.

### खासगी बसकडून लूट

रेल्वेत आरक्षित सीट मिळत नसल्याने तसेच बसेसला गर्दी वाढल्याने कोकणातून मुंबईत परतणाऱ्या चाकरमान्यांना आता केवळ खासगी बसचाच आधार आहे. त्यामुळे खासगी बसेसच्या प्रवासी संख्येत मोठी वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. याचाच फायदा घेऊन आता खासगी बसचालकांनी भाडेवाढ केल्याचे चाकरमानी सांगत आहेत.

### प्लॅटफॉर्मवर शेड नसल्याने त्रास

अनेक स्थानकांवर शेड नसल्याने प्रवाशांना भिजत गाडी पकडावी लागत आहे. गाडीची घोषणा झाल्यानंतर ती गाडी येईपर्यंत प्लॅटफॉर्मवर सामान सांभाळत गाडीची वाट पाहावी लागत आहे. मुसळधार पावसात दोन्ही हातात सामान घेऊन भिजत भिजत गाडी पकडावी लागत आहे.

# पुढच्या वर्षी लवकर या...




● (छायाचित्र : समीर मालोदे)

**। रायगड । प्रतिनिधी ।**

'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या', 'गणपती गेले गावाला, चैन पडेना आम्हाला'च्या जयघोषात जिल्हाभरात ठिकठिकाणी अनंत चतुर्दशीच्या दिवशी दहा दिवसांच्या गणपती बाप्पांना भावपूर्ण निरोप देण्यात आला. १८ हजार ४२ घरगुती, तर १६९ सार्वजनिक गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरासह पारंपरिक वाद्यांच्या तालावर नाचत गणेशभक्तांनी आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप दिला. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी रायगड पोलिसांकडून विविध ठिकाणी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पान २ वर

## विसर्जनादरम्यान पाच जणांचा मृत्यू

**मुंबई :** अनंत चतुर्दशीनिमित्त राज्यभरात दहा दिवसांच्या गणरायाचे वाजत गाजत विसर्जन करण्यात आले. पुण्यातील विसर्जन मिरवणुका ३१ तासानंतर थांबल्या. मुंबईमध्ये जवळपास सर्व गणपतींचे विसर्जन करण्यात आले आहे. मात्र, लालबागचा राजाचे विसर्जन रात्री उशिरा झाले. एकीकडे धूमधडाक्यात राज्यभरात लाडक्या बाप्पाला निरोप देण्यात आला. मात्र, दुसरीकडे गणेश विसर्जनादरम्यान विविध घटनांमध्ये पाच व्यक्तींचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. तसेच ११ व्यक्तींचा अजूनही शोध सुरू आहे.महाराष्ट्रातील सर्वच जिल्ह्यांमध्ये गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्यामुळे गणरायाला निरोप देण्यासाठी मोठ्या संख्येने भाविक घराबाहेर पडत असतात. प्रामुख्याने पुणे आणि मुंबईमध्ये गणपती विसर्जनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असते. मात्र, याच विसर्जनादरम्यान राज्यात विविध घटनांमध्ये ५ व्यक्तींचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तसेच ११ व्यक्तींचा शोध सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाकडून एनडीआरएफ आणि एसडीआरएफ यांना आपत्कालीन परिस्थितीकरिता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

# बँक ऑफ इंडिया कर्जत शाखेला आग

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत शहरातील महावीर पेठमध्ये असलेल्या बँक ऑफ इंडियाच्या शाखेला पहाटेच्या सुमारास अचानक आग लागली. या आगीत आयटी सर्वर जळाला असून, तीन कॉम्प्युटर, टेबल फॅन, प्रिंटर जळाला आहे. त्याचबरोबर एका टेबलवरील काही कागदपत्रे जळाली आहेत. कर्जत नगरपरिषदेची अग्निशमन बंब लगेचच तेथे पोहोचल्याने आग विझविण्यात आली. अन्यथा मोठा अनर्थ घडला असता.



● (छायाचित्र : संजय गायकवाड)

आज रविवारी पहाटे साडेचारच्या सुमारास बँकेच्या शाखेला आग लागली. सहाच्या सुमारास बँकेच्या इमारतीतून धूर येत असल्याचे काही नागरिकांच्या लक्षात आले. पान २ वर

# पनवेलचे तहसीलदार निलंबित

## जमिनींना अकृषिक सनद देणे भोवले

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांना अनियमितता केल्याच्या कारणावरून निलंबित करण्यात आले आहे. त्यांनी पनवेल तालुक्यातील काही गावांतील जमिनी औद्योगिक प्रयोजनासाठी खरेदी झाल्यानंतरही महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३-एक-अ मधील तरतुदीचे पालन न करता जाणीवपूर्वक अक्षम्य दुर्लक्ष केले असल्याची बाब शासनाच्या लक्षात आली. विजय पाटील यांनी या जमिनींना अकृषिक सनद देण्याची प्रक्रिया नियमबाह्य आणि अनियमित केली असल्याचा ठपका ठेवण्यात आला.

मेरेथॉन पनवेल इन्फास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी पनवेल तालुक्यातील वारदोली, पोयंजे, भिंगारवाडी, भिंगार, पाली बुद्रुक व भेरले येथील जमिनी या महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ चे कलम ६३ एक-अ मधील तरतुदीन्वये खऱ्या खुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी सन २००७ मध्ये खरेदी केल्या होत्या. त्यामुळे सदर जमिनीवर कलम ६३ एक-अ मधील तरतुदीन्वये कार्यवाही करणे अपेक्षित असताना, तहसीलदार विजय पाटील यांनी सदर बाबीकडे जाणीवपूर्वक अक्षम्य दुर्लक्ष करुन कलम ६३ एक अ मधील तरतुदींचा भंग करुन सदर जमिनीना अकृषिक सनद देण्याची अनियमितता केल्याचा ठपका ठेवत विजय पाटील यांचे निलंबन करण्यात आले आहे.

तहसीलदार विजय पाटील यांची कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ चे उल्लंघन करणारी असल्याने हे निलंबन करण्यात आले आहे. प्रस्तुत आदेश अंमलात असेपर्यंत विजय पाटील यांचे निलंबन कालावधीतील मुख्यालय जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथे असेल व त्यांनी जिल्हाधिकारी, रायगड यांच्या पूर्वसंमत्तीशिवाय मुख्यालय सोडता कामा नये, असे या आदेशात म्हटले आहे. तहसीलदारांच्या निलंबनाने महसूल विभागाला मोठा दणका मिळाल्याची चर्चा सध्या सर्वत्र सुरू असल्याचे दिसून येत आहे.

# 'दिघी क्वीन'चा डायलिसिस रुग्णांना मदतीचा हात

### उपचारासाठी जलवाहतूक प्रवास मोफत



**। दिघी । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन तालुक्यातील डायलिसिस रुग्णांचे मुरुड तसेच मुंबईकडे नियमित उपचारासाठी जाणे-येणे असते. अशा गंभीर आजाराने ग्रस्त व्यक्तींना येथील जंगल जेटी 'दिघी क्वीन' या प्रवासी बोटीतून प्रवास मोफत ठेवला आहे. दिघी जलवाहतूक व्यवस्थापकांच्या या सुविधेमुळे डायलिसिस रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे.

दिघी बंदरातून मुरुड तालुका तसेच मुंबईकडे जाण्यासाठी जलवाहतूक करणाऱ्या दोन कंपनीच्या बोटी कार्यरत आहेत. त्यातील दिघी येथील स्थानिक संस्थेची 'दिघी क्वीन' नावाने दिघी ते आगरदांडा अशी पान २ वर

**जिल्ह्यात १५ ग्रामस्तरीय प्रयोगशाळा | राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मिळणार लाभ**

# शेताच्या मातीची परीक्षा आता गावातच

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत मृद आरोग्य व सुपीकता कार्यक्रम २०२५-२६ मध्ये ग्रामस्तरीय मृद नमुने तपासणी प्रयोगशाळा स्थापन करण्यास मान्यता मिळाली आहे. जिल्हा कृषी विभागाने पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज मागवले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातील मातीचे परीक्षण थेट गावातच करता येणार असून, वेळ आणि खर्चदेखील वाचणार आहे.

माती परीक्षण म्हणजे मातीचा रासायनिक व सेंद्रिय पदार्थांचा अभ्यास करणे. हे शेतीमध्ये पीक उत्पादन वाढवण्यासाठी, योग्य पिकांची निवड करण्यासाठी, खतांचा योग्य वापर करून खर्च कमी करण्यासाठी, मातीची सुपीकता सुधारण्यासाठी आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी केले जाते. प्रयोगशाळा चालविण्याची संधी कृषी चिकित्सालय, कृषी व व्यवसाय केंद्र, माजी सैनिक, शेतकरी उत्पादक संस्था, सहकारी संस्था, निविष्ठा विक्रेते, बचत गट तसेच शालेय व महाविद्यालयीन तरुण-तरुणींना अर्ज करता येणार आहे.

अर्जदाराचे वय १८ ते २७ वर्षे हवे. किमान शैक्षणिक पात्रता दहावी (विज्ञानासह) उत्तीर्ण, एमएस-सीआयटी प्रमाणपत्र आवश्यक, प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी स्वतःकडे चार वर्षांपेक्षा जुन्या नसलेल्या इमारतीचा ताबा असणे, आधार कार्ड आवश्यक आहे. पाच लाख रुपये अनुदान शासनाकडून प्रत्येक प्रयोगशाळेसाठी दिले जाणार आहे.

हा निधी आवश्यक उपकरणे, साहित्य आणि पायाभूत सुविधा उभारण्यासाठी वापरला जाणार आहे. यातून शेतकऱ्यांना चांगल्या सोयीसुविधा मिळणार आहेत. जिल्ह्यात १५ ग्रामस्तरीय मृद नमुना तपासणी प्रयोगशाळा उभारण्यात येणार आहेत. अधिक माहितीकरिता जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी, रायगड यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केला आहे.

### अर्ज जास्त असल्यास सोडत काढणार

जर प्राप्त अर्जांची संख्या निश्चित लक्षांकापेक्षा जास्त असेल, तर जिल्हास्तरीय निवड समितीकडून पारदर्शक सोडत प्रक्रिया राबवून अर्जदारांची निवड केली जाईल.



# आरोग्य सेवेवर गंभीर परिणाम

## कंत्राटी कर्मचाऱ्यांचा संप कायम

**। रायगड । प्रतिनिधी ।**

राज्यातील राष्ट्रीय आरोग्य अभियानातील (एनएचएम) कंत्राटी कर्मचाऱ्यांचा संप सलग २१ व्या दिवशी सुरू आहे. याचा परिणाम ग्रामीण भागातील आरोग्य सेवांवर होत असून, क्षयरोग (टीबी) निदान, पोषण पुनर्वसन केंद्रे आणि विशेष नवजात शिशू काळजी विभाग या महत्त्वाच्या सेवांना फटका बसत आहे. राज्यात रुग्णसेवेची स्थिती गंभीर बनली असून, याची जबाबदारी कोण घेणार, असा प्रश्न आता उपस्थित करण्यात येत आहे. राज्यातील ८२ पोषण पुनर्वसन केंद्रांपैकी २७ केंद्रांमध्ये संपामुळे सेवा बंद आहे.

राज्यातील एकूण ६० विशेष नवजात शिशू काळजी विभागांपैकी तब्बल ४१ विभागांमधील कर्मचारी संपावर आहेत. नंदुरबारमधील अक्कलकुवा, अमरावतीतील धारणी, अचलपूर, गडचिरोलीतील अहेरी यांसारख्या संवेदनशील भागांतील सेवाही ठप्प आहेत. त्यामुळे संप सुरू झाल्यापासून ५० हून अधिक बालमृत्यू झाले आहेत, असे कर्मचारी संघटनेने म्हटले आहे.

दरमहा सरासरी १८ हजार क्षयरुग्णांची नोंद होत असते. ऑगस्ट महिन्यात केवळ ९ हजार ४९० प्रकरणेच नोंदविली गेली आहेत. यावरून क्षयाचे निदान व उपचार प्रक्रियेवर संपाचा तीव्र परिणाम होत असल्याचे स्पष्ट होत आहे. यासह राज्यातील लसीकरणावरही परिणाम झाला आहे. प्रत्येक आरोग्य केंद्रामध्ये महिन्याला ४ लसीकरण सत्र आयोजित करण्यात येतात. मागील १७ दिवसांच्या कालावधीत लसीकरण बहुतांश ठिकाणी झालेले नाही, असे संघटनेने स्पष्ट केले आहे. याप्रकरणी २२ ऑगस्टला बैठक घेण्यात आली होती. मात्र, आरोग्य विभागाचे आयुक्त अथवा सचिव या बैठकीस अनुपस्थित राहिले आणि केवळ त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीचे इतिवृत्त आजअखेरपर्यंत देण्यात आले नसल्याने चर्चेत समाधानकारक निर्णय न झाल्याचे संघटनेने नमूद केले आहे. दरम्यान, संघटनेच्या संपावर सरकारने लवकरात लवकर तोडगा काढून योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी सर्व स्तरातून करण्यात येत आहे.

# शिक्षकांची फेरतपासणी होणार?

## खोट्या दिव्यांग प्रमाणपत्राचे सादरीकरण?

। रसायनी । प्रतिनिधी ।

वर्षानुवर्षे एकच शाळा, एकच तालुका घेऊन बसलेले आणि दिव्यांग प्रमाणपत्र खोटे सादर करून लाभ घेतलेल्या शिक्षकांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी शिक्षकांनी केली आहे.

शिक्षक बदली प्रक्रिया २०२५ अनेक दावे, हरकती यामुळे प्रलंबित आहे. शासन निर्णयानुसार दि. १ ते ३१ मे या कालावधीत पार पडणारी बदली अद्याप विविध हरकती यांच्यामुळे लांबली आहे. त्यामुळे याचा परिणाम शिक्षण प्रक्रियेत होणारा असून, विद्यार्थ्यांचे नुकसान करणारा आहेच. पण, खरा शिक्षकदेखील भरडणार आहे, त्यामुळे शिक्षकांमध्ये असंतोष माजला आहे.

३ सप्टेंबर रोजी रायगड जिल्ह्यातील अनेक शिक्षकांनी सदरची बदली प्रक्रिया ही अन्यायकारक असून, ती रद्द करून सुधारित बदलाने व नव्याने राबविण्यात यावी, अशी मागणी मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी तसेच समाजकल्याण अधिकारी यांच्याकडे अर्ज देऊन केली आहे.

सदरची बदली प्रक्रिया राबविताना शासनाने संवर्ग एक ते संवर्ग सात असे निर्माण केले आहेत. तथापि, संवर्ग एक व संवर्ग दोनमधील अनेक शिक्षकांनी खोटे पुरावे सादर करून बदलीतून सूट घेतली आहे, असा आरोप करण्यात आला असून, मार्गस्थ व जवळच्या शाळा बळकावल्या आहेत. काही शिक्षक वर्षानुवर्षे एकाच शाळेवर आहेत, काहींनी खोटे पुरावे सादर केले आहेत, त्यांची कसून चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. त्यामुळे प्रामाणिक शिक्षक यांना न्याय मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. ऑनलाईन बदली प्रक्रियेत पारदर्शकता यादी व कोणावरही अन्याय न होता बदली प्रक्रिया राबवली जावी म्हणून रायगड जिल्ह्यातील बहुसंख्य शिक्षकांनी पुकारलेल्या या लढ्यात अनेक शिक्षक सहभागी होत असून, न्याय मिळेपर्यंत लढा देण्यासाठी तयारी केली आहे.

दिव्यांग प्रवर्गातून नोकरी मिळविलेल्या उमेदवारांची फेर वैद्यकीय तपासणी करुन ज्या शिक्षकांनी खोटे पुरावे सादर केले, त्यांची चौकशी करण्यात यावी. दि. १९ जुलै २३ ऑगस्ट २०२४ या कालावधीत बोगस दिव्यांग प्रमाणपत्र शोध अभियान राबविण्यात आले होते.

सदर अभियानातून शासकीय व निमशासकीय सेवेत विविध विभागांमध्ये बोगस प्रमाणपत्र द्वारे नियुक्ती मिळवली आहे काही उमेदवारांची नावे निदर्शनास आली आहेत. याची चौकशी होण्यास का विलंब होत आहे? असा प्रश्न शिक्षकांनी उपस्थित केला आहे.

# रोह्यात पावसाची दमदार बॅटिंग

। रोहा । प्रतिनिधी ।

काही काळ विश्रांती घेतल्यानंतर पुन्हा एकदा पावसाचं रौद्ररुप बघायला मिळत आहे. रोहे तालुक्यातील कोलाड, सुतारवाडी, नागोठणे, सुकेळी खिंड,मेढे,चणेरा, घोसाळे,भालगाव, धाटाव, किल्ला या भागात मुसळधार पावसाने अक्षरश: थैमान घातले आहे. अनंत चतुर्दशी गणपती विसर्जनानंतर सक्रिय झालेल्या पावसाने रात्रीपासून परिसराला झोडपून काढले आहे. या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. तर, अनंत चतुर्दशीनंतर कोकणवासीय गणेशभक्तांच्या परतीच्या प्रवासात या पावसाने मात्र विघ्न आणले आहे.

विशेष म्हणजे, गणेशोत्सवात रिमझिम बरसणाऱ्या पावसाने शनिवारी रात्रीपासून धुवाधार सुरुवात केली आहे. सखल भागात पाणी तुंबत असल्याने नागरिकांचे हाल होत आहेत. तर काही ठिकाणी खड्ड्यात पावसाचे पाणी जमा होत असल्याने त्याचप्रमाणे खडड्यांचा अंदाज मिळत नसल्याने रस्त्यावर दुचाकीस्वार पडून अनेक ठिकाणी अपघात घडले आहेत.


जा क्र. १५/२०२५-२६
दिनांक :- ०६/०९/२५

**निविदा सूचना**

इको ग्रीन्स फेज II को-ऑप हाऊसिंग सोसायटी लिमिटेड, सर्व्हे क्रमांक १/३, देऊळवाडी, कर्जत, जिल्हा रायगड-४१०२०१, कन्व्हेयन्स डीड सेवांसाठी अनुभवी कंपन्यांकडून कोटेशन मागवत आहे. इच्छुक पक्षांनी सीलबंद कोटेशन (दिनांक : २२/०९/२०२५ वेळ: संध्याकाळी ६.०० पर्यंत) पर्यंत सादर करावेत:

१. कामाची व्याप्ती आणि कार्यपद्धती
२. तपशीलवार फी आणि कर
३. कामाकरिता लागणार कालावधी
४. संबंधित अनुभव आणि प्रमाणपत्रे
५. पॅन आणि जीएसटी तपशील

कोटेशन पत्ता : सचिव, इको ग्रीन्स फेज II को-ऑप एचएसजी सोसायटी लिमिटेड, सर्व्हे क्रमांक १/३, देऊळवाडी, कर्जत, जिल्हा रायगड-४१०२०१.
कोटेशन स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार व्यवस्थापकीय समिती राखून ठेवते.
अंतिम तारीख :(दिनांक: २२/०९/२०२५ वेळ: संध्याकाळी ६.०० पर्यंत)

sign/-
CHAIRMAN SECRETARY TREASURER



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक शुभदा नितिन ढवळीकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे - ढाक तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| २७/१/ब | एकुण क्षेत्र ४-९८-०० हे आर पॉ यापैकी वरील मालक यांचे एकुण क्षेत्र ०-९८-०० हे आर पॉ एवढे क्षेत्र | २-३५ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०७/०९/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर. अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९ तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१


# सोनूबाई भोसले यांचे निधन

। नागोठणे । प्रतिनिधी ।

नागोठण्याजवळील आमडोशी गावातील रहिवासी आणि गावातील वारकरी संप्रदाय व महिला मंडळाच्या आधारस्तंभ सोनाबाई धोंडू भोसले उर्फ आक्का (८२) यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले.



नागोठण्यातील मायलक्ष्मी नर्सिंग होमचे संचालक डॉ. सुनील पाटील यांच्या त्या मानलेल्या बहीण होत्या. दिवंगत सोनूबाई भोसले यांच्या पार्थिवावर आमडोशी येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी भोसले कुटुंबियांसह त्यांचे नातेवाईक, सगेसोयरे, मित्रपरिवार, पंचक्रोशीतील नागरिक तसेच आमडोशी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिवंगत सोनूबाई भोसले यांचे दशक्रिया विधी बुधवार, दि. १० सप्टेंबर रोजी आमडोशी येथील श्री माणकेश्वर मंदिर जवळील तलावावर, तर उत्तरकार्य शनिवार, दि. १३ सप्टेंबर रोजी आमडोशी येथील त्यांच्या निवासस्थानी होणार असल्याचे भोसले कुटुंबियांकडून सांगण्यात आले.

# हेटवणे धरण जलबोगदा स्थानिकांची चिंता वाढवणारा : म्हात्रे

। खरोशी । प्रतिनिधी ।

शहरी व औद्योगिक विकासाठी प्रकल्प अशी या हेटवणे धरणाची नव्याने ओळख होत आहे. रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील या मोठ्या धरणाची निर्मिती ही खारेपाट विभागात सिंचन आणि पिण्याचे २४ तास पाणी मिळेल यासाठी झाली आहे. मात्र, आता जलबोगदा तयार करून शहरासाठी, औद्योगिक विकासासाठी या पाण्याचा उपयोग करण्याचे प्रयत्न सुरू झालेत. वास्तविक, हे पाणी पळविण्याचे धोरण राबवित असताना, स्थानिक ग्रामपंचायत ते आमदार, खासदार या सर्वोच्च लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले असावे. मात्र, जनतेची काळजी असणारे लोकप्रतिनिधी



याला संमती देणार कसे, पण तरीही असे धोकादायक काम होत आहे, ही बाब चिंताजनक असल्याचे वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी.आर. म्हात्रे यांनी सांगितले.

बोगद्याच्या कामामुळे लगतच्या डोंगरांना तडे जाण्याचा धोका निर्माण होणार आहे. भूस्खलन होताना दिसेल, भूगर्भातील पाण्याचा प्रवाह बदलेल, असे अभ्यासक म्हणतात. उत्तर प्रदेशातील जी हानी आपणास दिसते, ती याचेच द्योतक आहे.

एवढे मोठे हेटवणे धरण असूनही धरण उशाला कोरड घशाला अशी अवस्था वाशी खारेपाटासह खेड्यातील जनतेची असून, दोन-तीन दिवस पाण्याची वाट पाहावा लागत आहे. २४ तास पाण्याचे स्वप्न पूर्ण झाले नाही, सिंचनासाठीचे ७६६ कोटींचे कार्यारंभ होत नाही. पुढे जाऊन दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होईल, इतर राज्यातून हद्दपार झालेले कारखाने जलवाहतुकीमुळे तालुक्यात येत आहेत. पेण तालुका भाताचे कोठार राहील का, अशी शंकाही व्यक्त केली आहे.

याबाबत जनसुनावणी न घेता बोगद्याचे काम सुरू आहे हे चित्र धोकादायक आहे, असे मत सी. आर. म्हात्रे यांनी व्यक्त केले.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक अलोक विवेक किणीकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे - ढाक तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १४/४ | एकुण क्षेत्र ०-४७-८० हे आर पॉ | १-६९ |
| १४/५ | एकुण क्षेत्र ०-२२-५० हे आर पॉ | १-८७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ०७/०९/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
**मोबा. ८५३०१४६८५४**
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड. कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हू मोरे**
**मोबा. ९८२२६९११०९**
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर. अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१


## पान १ वरून

### श्रीसदस्यांकडून ६७४२ टन निर्माल्य गोळा

राबविण्यात आला. विसर्जनासाठी आलेल्या भाविकांनीदेखील या उपक्रमाला भरभरून प्रतिसाद दिला. निर्माल्य स्वखुशीने श्रीसदस्यांकडे सुपूर्द करून, पर्यावरण रक्षणात आपले योगदान दिले.

उपक्रमाला प्रतिष्ठित व्यक्तींचा पाठिंबा

या उपक्रमाच्या ठिकाणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गृहमंत्री योगेश कदम, भाजपा मुंबई अध्यक्ष अमित साटम, आ. अशोक चव्हाण, मंगलप्रभात लोढा, अनिल परब, उपायुक्त भाग्यश्री वर्तक, सहायक आयुक्त चक्रपाणी अल्ले, अमृता फडणवीस, सुखराज नाहर, निरंजन हिरानंदानी, मिकी मेहता आदी मान्यवरांनी भेट देत, श्रीसदस्यांचे कौतुक केले.

### मुरुड किनारी १४९ मूर्तींचे पुनर्विसर्जन

माजगाव, राजपुरी, एकदरा, समुद्रकिनारी जवळपास १४९ प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती वाहून आल्या होत्या. सकाळी समुद्राला ओहोटी लागल्यावर किनारी वाहून आलेल्या मूर्ती डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे गणेशमूर्तींचे ३४ श्रीसदस्यांनी पुन्हा खोल समुद्रात बोटीच्या साह्याने नेऊन विसर्जित केल्या.

दरम्यान, मूर्तींचे पुन्हा विसर्जन केल्यानंतर सपूर्ण समुद्रकिनारा स्वच्छ केला. तसेच येणाऱ्या पर्यटकांना भग्न मूर्ती दिसू नये म्हणून पहाटे सहा वाजताच श्रीसदस्यांनी किनाऱ्यावर येत काम सुरू केले. वाहून आलेल्या मूर्तींना एकत्रित करून छोट्या बोटीतून खोल समुद्रात नेऊन पुन्हा विसर्जित करण्यात आल्या. डॉ. नानासाहेब प्रतिष्ठानतर्फे श्रीसदस्य गेले अनेक वर्षे प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींचे विसर्जन करण्याचे काम करत आहेत, तसेच किनारेही स्वच्छ करण्यात येतात. पण, जनजागृती होऊन मतपरिवर्तन होणे गरजेचे आहे, त्यासाठी सुशिक्षित लोकांनी पुढे येऊन स्वतः शाडूच्या मूर्ती आणणे गरजेचे आहे, असे मत श्रीसदस्यांनी व्यक्त केले.

### व्यावसायिकाची गळफास घेत आत्महत्या

पाणी सुरळीत चालू असताना संतोष याने अचानक आत्महत्या का केली, याचं कारण अद्यापही अस्पष्ट आहे. महाड एमआयडीसी पोलीस ठाणे येथे सदरच्या मृत्यूची आकस्मिक मृत्यू अशी नोंद करण्यात आली असून, सदरचा मृत्यू देह शवविच्छेदनाकरिता प्राथमिक आरोग्य केंद्र बिरवाडी येथे पाठविण्यात आला आहे. संतोष याने अचानक आत्महत्या करून आपलं जीवन संपवल्याने समाजामध्ये व विभागामध्ये शोककळा पसरली आहे. महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार आशिष नटे या संपूर्ण घटनेचा अधिक तपास करीत आहेत.

### चाकरमान्यांची कोंडी

विशेष फेऱ्यांमुळे प्रवाशांची सोय झाली असली तरी, परतीच्या प्रवासातील हालअपेष्टांमुळे प्रवाशांमध्ये नाराजी आहे. सावंतवाडी, कुडाळ, कणकवली, आणि सिंधुदुर्गनगरी यांसारख्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील स्थानकांवर प्रवाशांची प्रचंड गर्दी आहे. रात्रीच्या वेळी सुटणाऱ्या गाड्या अनेक तास उशिराने येत असल्यामुळे प्रवाशांना स्थानकावर जागा मिळत नाही आणि त्यांना रात्री खोळंबून राहावे लागत आहे. काही गाड्या तर मध्यरात्री १ ते २ वाजता सुटत आहेत.

**लालपरीसुद्धा अपुरी**

कोकण रेल्वेचे वेळापत्रक कोलमडल्याने कोकणवासियांनी परतीच्या प्रवासासाठी लालपरीला पसंती दिल्याचे दिसून आले. परंतु, अचानक एसटी बसेसला गर्दी वाढल्याने त्यादेखील प्रवाशांसाठी अपुऱ्या पडत आहेत. त्यातच महामार्गाच्या दुरवस्थेमुळे झालेल्या वाहतूक कोंडीत अडकलेल्या एसटीमधील प्रवाशांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

### बँक ऑफ इंडिया कर्जत शाखेला आग

त्यांनी लगेचच बँक कर्मचाऱ्यांशी संपर्क साधला. शाखा व्यवस्थापक गजेंद्र घाडगे, नुकतेच निवृत्त झालेले स्पेशल असिस्टंट दिलीप बडेकर, जयवंत बडेकर घटनास्थळी पोहोचले. त्यांनी दरवाजा उघडल्यानंतर आगीचा भडका झाला. त्यांनी लगेचच अग्निशमन दलाशी संपर्क केला. अग्निशमन दलाचे प्रदीप हिरे यांनी आग विझवली. डिपार्टमेंट मॅनेजर विनीत जाधव हेसुद्धा घटनास्थळी पोहोचले. तर, सुरक्षा दलाचे अधिकारी अभिजीत पठारे हेसुद्धा बँकेत आले.

या आगीत आयटी सर्वर जळाला असून, तीन कॉम्प्युटर, छोटा टेबल फॅन, एक प्रिंटर आणि एका टेबलवरील काही कागदपत्रे, केबल जळल्या आहेत. बँकेचा आतील भाग पूर्णपणे धुराने काळा झाला आहे. ही आग शॉर्ट सर्किटने लागली असावी, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. उद्या सोमवार आहे. बँकेचे कामकाज सुरु करण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. तरी नागरिकांनी सहकार्य करावे, अशी विनंती शाखा व्यवस्थापक गजेंद्र घाडगे यांनी केली आहे.

### पुढच्या वर्षी लवकर या...

गेले दहा दिवस बाप्पाच्या आगमनाने वातावरण चांगलेच भक्तीमय झाले होते. विविध सार्वजनिक मंडळांनी राष्ट्रहिताचे तसेच देशप्रेम जागवणारे देखावे उभे केले केले होते. भजन, कीर्तनासह सांस्कृतिक कार्यक्रमांची दहा दिवस चांगलीच रेलचेल होती. सकाळ-संध्याकाळी घराघरातून आरतीच मंजूळ सूर कानी पडत होते. एक वेगळा उत्साह अंगी संचारला होता. परंतु, विसर्जनाच्या दिवशी सर्वच भक्तांच्या डोळे पाणावलेले दिसत होते. अलिबाग समुद्रकिनारी नगरपालिकेकडून विसर्जनासाठी चोख व्यवस्था करण्यात आली होती. कृत्रिम तलाव, निर्माल्य कलश, मदत केंद्र उभारुन गणेशभक्तांना मदत करण्यात येत होती. दुपारी चारनंतर जिल्हाभर सर्वत्र विसर्जन मिरणुका काढण्यात आल्या. रात्री उशिरापर्यंत हा विसर्जन सोहळा पार पडला. तलाव, नदी-नाले, समुद्रकिनारी बाप्पाच्या विसर्जनाची ग्रामपंचायत, नगरपंचायतींच्या माध्यमातून चोख व्यवस्था करण्यात आली होती. विसर्जनघाटाचा परिसर 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' अशी बाप्पाला आर्त साद घालण्यात येत होती. त्यामुळे सारा परिसर भारावून गेला होता.

### 'दिघी क्वीन'चा डायलिसिस रुग्णांना मदतीचा हात

रोरो प्रवासी वाहतूक सुरू आहे. या प्रवासादरम्यान आठवड्यातून तीनदा डायलिसिस करणाऱ्या आठ ते दहा रुग्णांची होणारी परवड दिसून आली.

दिघी, बोर्लीपंचतन परिसरातील रुग्णांना जास्त करून उपचारासाठी मुरुड येथे आठवड्यातून दोन ते तीन वेळा जावे लागते. तासाभराच्या अंतरात दिघी व आगरदांडा या ठिकाणांहून जलवाहतूक होत असल्याने ही मोफत सेवा सोयीची ठरत असल्याचे रुग्ण सांगत आहे.

### ... सात जनावरे दगावली

मृतावस्थेत आढळून आली. घटनेची माहिती म्हसळा तहसील कार्यालय, पोलीस ठाणे, वीज वितरण कंपनी आणि पशुवैद्यकीय अधिकारी यांना दिली. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन रीतसर पंचनामा केला आहे. या दुर्घटनेत दुग्ध व्यवसाय करणारे जीवन लाड यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

### शॉक लागून बैलाचा मृत्यू

त्यामुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले. केबल तुटलेली असल्याने मनुष्यहानीदेखील होऊ शकते. वायरमनच्या बेपरवाईमुळे ही घटना घडली असल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे नुकसानभरपाई मिळावी आणि वायरमनवर कारवाई व्हावी, अशी मागणी पाटील यांच्याकडून केली जात आहे.

### सुकेळी खिंडीत बस-टेम्पोचा अपघात

उपलब्ध झालेल्या माहितीनुसार, रत्नागिरी बाजूकडून पेणकडे जाणारा आयसर टेम्पो क्र. एम.एच. ०८ ए.पी. १९४४ हा खैरवाडी गावाजवळ आला असता टेम्पोचे टायर रस्त्यावरुन स्लिप झाल्यामुळे मागून येणाऱ्या एसटी बस क्र. एम.एच. ०६ बी. डब्ल्यू ८२०३ याला धडक देऊन हा अपघात घडला. या अपघातात टेम्पोमधील प्रशांत मांडवकर (३४) रा. रत्नागिरी यांचे पाय टेम्पोमध्ये अडकले होते. जवळपास अर्ध्या तासानंतर येथील स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने तसेच नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्याचे सर्व कर्मचारी व वाकण टॅबच्या सर्वच कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने प्रशांत यास सुखरूप बाहेर काढण्यात आले. त्यास तातडीने जिंदाल रुग्णालयाच्या रुग्णवाहिकेतून उपचारासाठी जिंदाल रुग्णालयात नेण्यात आले. तेथील डॉक्टरांकडून त्यांच्यावर प्रथमोपचार करुन पुढील उपचारासाठी पुढे पाठवण्यात आले. या अपघाताचा पुढील तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी करीत आहेत.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. रजपे, ता. कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. राजेश बद्रीप्रसाद मोदी यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे- आर-पॉ) | आकार(रू.पै) |
|---|---|---|---|
| २ | ६ | १-६४-०० | १-४४ |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०८/०९/२०२५

**ॲड. राकेश भरत भोईर**
ऑफीस- कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी व जिल्हा रायगड, पोटतुकडी व तालुका रोहा, यांचे हद्दीतील मौजे-कोडगाव, ता. रोहा, जिल्हा रायगड, यांचे हद्दीतील शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्यासाठी, मिळकतीचे विद्यमान मालक यांचेबरोबर वाटाघाटी केल्या आहेत. सदर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे मालकांनी आमचे अशिलास दिला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गट नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|
| १०९ | ०-४१-५० | ९.०६ | श्री. कैलास मोहन पवार |

तरी वरील मिळकतींचे संदर्भात कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध, ताबा, मालकी, वहिवाट, बयाना, साठेकरार, लीज, लीएन, चार्ज, बोजा, पोटगीहक्क, डिक्री, तारण, गहान, जाणेयेणेचा व इतर हक्क असल्यास त्यांनी हक्काचे पुष्ठ्यार्थ असणाऱ्या सर्व कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कराव्यात. वरील मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास, वरील मिळकतीत कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध नाही अथवा असल्यास तो आमच्या अशिलांच्या लाभात सोडून दिला आहे, असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही हरकत, तक्रार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दि. ८/९/२०२५

**(ॲड. महेंद्र यशवंत धामणे)**
मु.पो. सुप्रिम कॉलनी नागोठणे, ता. रोहा, जि. रायगड
मो.नं. ९७६७२५०११०



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक विजय घनश्याम गांगल यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे - ढाक तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १४/२ | एकुण क्षेत्र ०-०९-०० हे आर पॉ | ०-५३ |
| ५१/४ | एकुण क्षेत्र ०-२४-५० हे आर पॉ | २-४४ |
| ३२/४ | एकुण क्षेत्र ०-०८-४० हे आर पॉ | ०-०५ |
| ५५/१ | एकुण क्षेत्र ०-१५-७० हे आर पॉ | ०-८० |
| ४९/१ | एकुण क्षेत्र ०-२६-०० हे आर पॉ | २-३७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०७/०९/२०२५

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर. अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९ तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१


# अपघातात दोघे जखमी

**नवीन पनवेल :** मुंबई-गोवा महामार्ग कर्नाळा पक्षी अभयारण्य खिंडीमध्ये ३ सप्टेंबर रोजी सकाळी पावणे सातच्या दरम्यान उतारावर रिक्षा आणि चार चाकी कारचा अपघात झाला. या अपघातात रिक्षातील दोघेजण जखमी झाले. या अपघाताप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात एर्टिगा कार चालक विक्रम विठ्ठल तोरणे (रा. कोपरखैरणे) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

विजय महादेव कदम (रा. भांडुप पश्चिम) हे मुंबई-गोवा महामार्गाने मुंबई लेनने भांडुप मुंबई येथे ऑटो रिक्षा क्रमांक एमएच ०३ बीवाय ८८५३ ने जात होते. कर्नाळा पक्ष अभयारण्य उताराजवळ त्यांची रिक्षा आली असता त्यांचा नातू याला लघुशंकेसाठी रिक्षा थांबवत असताना अचानक पाठीमागून एर्टिगा टुरिस्ट कार


SARASWATI EDUCATION SOCIETY'S
**YADAVRAO TASGAONAKAR INSTITUTE OF ENGINEERING & TECHNOLOGY**
(Approved by AICTE, DTE Maharashtra State & Affiliated to University of Mumbai)
Village Chandhai, Post Nasrapur, Bhivpuri Road Railway Station, Tal. Karat, Dist. Raigad 410201 Maharashtra.

**ADMISSION NOTIFICATION 2025-26**

**First Year B.E. Engineering (DTE Code: EN 3147)**
**First Year M.E. Engineering (DTE Code: EN 3147)**
**First Year MMS (DTE Code: EN 3147)**

**Applications are invited from eligible candidates for admission against vacant seats after CAP Round IV (ACAP) in the following programs:**
- First Year B.E. (Engineering)
- First Year M.E. (Engineering)
- First Year MMS

**Interested candidates are required to submit their applications in the prescribed format along with necessary documents to the Admission Office within the stipulated time.**

| Name of Courses | Course code | Vacant Seat |
|---|---|---|
| B.E. in Computer Science | 314724510 | 25 |
| B.E. in Information Technology | 314724610 | 34 |
| B.E. in Civil Engineering | 314719110 | 21 |
| B.E. in Mechanical Engineering | 314761210 | 58 |
| B.E. in Electrical Engineering | 314729310 | 20 |
| B.E. in AIML | 314792110 | 9 |
| B.E. in Data Science | 314791710 | 16 |
| M.E. in Computer Science | 314724510 | 14 |
| M.E. in Mechanical | 314790410 | 18 |
| M.E. in Electrical Power system | 314729210 | 9 |
| Master in Management Studies | 314710210 | 29 |

**The schedule of admission procedure is as follows**
- Sale and Issue of Application Forms: From **06th September 2025 to 10th September 2025.** Time: **09:00 am to 04:00** pm Venue: **Admission Office. Cost of Information Brochure with Admission Form: ₹300/- only**
- **Submission of Completely Filled Application Forms:** 06th Sept. to 10th September 2025, Time: 10:00 am to 04:00 pm.
- **Display of Provisional Merit List:** 11th September 2025 at 03:00 pm **(On Institute Notice Board and Website)**
- **Reporting to the Institute by submitting completely filled admission form with relevant documents:** 10.00 am to 05.00 pm from **12th of Sept. 2025 to 14th of Sept. 2025.**
- Online Registration & Documents Verification is mandatory from the competent authority.
- **For schedule & changes please refer Govt. of Maharashtra state CET cell website** (https://cetcell.mahacet.org) and their Information Brochure A.Y. 2025-26.
- **M.E. Engineering Admissions 2025-26 Display of Provisional Merit List:** 8th September 2025 on Institute Website and Reporting to the Institute along with relevant documents from 9th September 2025 to 10th September 2025 Time: 10:00 AM to 05:00 PM

-Principal
Yadavrao Tasgaonakar Institute of Engineering & TECHNOLOGY
principal.ytiet@tasgaonkartech.com

+91 9967640120 / +91 9768140203 | www.ytiet.com

## निवडक



### उरणमध्ये बाप्पाचे भक्तिपूर्ण विसर्जन

**उरण :** हजारो भाविकांनी पावसाच्या सोबतीने दहा दिवसांच्या गणपती बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला. शनिवारी संध्याकाळपासूनच ठीक-ठिकाणाहून ढोलताशांच्या गजरात विसर्जनाच्या मिरवणुका निघाल्या होत्या. बाप्पाच्या विसर्जन सोहळ्यामुळे उरण तालुक्यातील ग्रामीण भागांसह उरण शहर भक्तिमय झाले होते. उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी समीर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विमला तलाव, भोवरा तलाव व मोरा जेट्टी येथे व्यवस्था करण्यात आली होती. तसेच, बाप्पाचे विसर्जन करताना कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून प्रत्येक ठिकाणी कर्मचाऱ्यांची व्यवस्था देखील करण्यात आली होती.

### बाप्पाला निरोप देण्यासाठी महिलांचा सहभाग



**माथेरान :** गणेशोत्सव काळात घरोघरी बाप्पांचे दर्शन घेण्यासाठी बालगोपालांसोबत जात असतात. विशेषतः महिला या सणाच्या काळात उत्स्फूर्त सहभाग नोंदवुन विविध पारंपरिक खेळांचे आयोजन करून एकोप्याने आनंदाने एकत्रित येत असतात. यावेळी आपल्या लाडक्या बाप्पाला निरोप देताना संत रोहिदास नगर येथील महिलांनी लेझीमच्या तालावार भक्तिगीते गाऊन नाचत-गात सहभागी झाल्या होत्या. यामध्ये अध्यक्षा रंजना बोंबे, श्वेता कारंडे, सविता काळे, रेश्मा कारंडे, धनश्री कदम, ज्योती सोनावणे, मनिषा डोईफोडे, सुहासिनी दाभेकर, काजल सोनावणे यांसह अन्य महिलांनी लेझीममध्ये सहभाग घेतला होता.



### मंगलमय वातावरणात बाप्पाचे विसर्जन

**श्रीवर्धन :** शहरात अनंत चतुर्दशीच्या गणरायांना सायंकाळी समुद्रकिनाऱ्यावर भावपूर्ण निरोप देण्यात आला. श्रीवर्धन आगार, कसबा मित्र मंडळ व सोमजाई देवस्थान असे ३ सार्वजनिक तर २६३ घरगुती गणपतींचे मनोभावे विसर्जन करण्यात आले. सायंकाळ दरम्यान पाखाडी व आळीतील भाविकांनी एकत्रित येऊन घरातील गणपती मूर्ती डोक्यावर, हातगाडी तसेच पालखीत ठेवत समुद्रावर विसर्जनासाठी नेल्या. यावेळी रस्त्यात भजने व प्रत्येक चौकात आरत्यांमुळे वातावरण मंगलमय झाले होते. दिवसभरात पावसाने विश्रांती घेतल्याने विसर्जन वेळी अडथळा आला नाही.

### माणगावात बाप्पाचे उत्साहात विसर्जन



**माणगाव :** तालुक्यातील दहा दिवसांच्या सार्वजनिक व घरगुती गणपतींना भावपूर्ण निरोप देत गणपतींचे उत्साहात विसर्जन करण्यात आले. शनिवारी दुपार पासूनच विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी व गणेश भक्तांनी आपले दहा दिवसांचे गणपती विसर्जनासाठी बाहेर काढले. माणगावातील प्रसिद्ध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा साईनगराचा राजा, जय हनुमान मित्र मंडळ उतेखोलवाडीचा गणराय, एकलव्य मित्रमंडळ नाणोरे आदिवासीवाडीचा गणराय, माणगाव बसस्थानकातील गणराय, ढालघरचा राजा हे एक आकर्षण होते. यावेळी माणगाव नगरपंचायतीतर्फे नगराध्यक्ष शर्मिला सुर्वे यांच्यासह ज्ञानदेव पवार, आनंद यादव, हर्षदा काळे, मुख्याधिकारी संतोष माळी, कर्मचारी तसेच माणगावचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी गणेश भक्तांचे स्वागत केले.

### कर्जतमध्ये १,१२४ बाप्पांना निरोप



**नेरळ :** कर्जत तालुक्यात अनंत चतुर्दशी निमित्त मोठ्या उत्साहात विसर्जन सोहळे साजरे झाले. यावेळी तालुक्यात घरगुती १,१२४ आणि १४ सार्वजनिक बाप्पांना निरोप देण्यात आला. शनिवारी तालुक्यातील बहुसंख्य ठिकाणी वाहत्या पाण्यात बाप्पांचे विसर्जन करण्यात आले. येथील उल्हास नदीवर कर्जत नगरपरिषदेकडून गणेश घाट सज्ज ठेवण्यात आले होते. तसेच, नगरपरिषदेकडून निर्माल्य कलश आणि भक्तांकडून विसर्जन तलाव देखील बनवण्यात आले होते.



### अंबा घाट गणेश भक्तांनी फुलला

**नागोठणे :** 'निरोप देतो देवा, आज्ञा असावी.. अशी याचना करीत नागोठणे शहर व परिसरांतील अनंत चतुर्दशीच्या २२० खासगी व ८ सार्वजनिक गणपती बाप्पांना निरोप देण्यात आला. विसर्जनाच्या वेळी पावसाने पूर्णपणे विश्रांती घेतल्याने नागोठण्यातील अंबा विसर्जन घाट गणेश भक्तांनी फुलला होता. अंबा घाटावर रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास विसर्जन सोहळा पूर्ण झाला. विसर्जनदरम्यान अंबा घाटावरील विसर्जन स्थळी नागोठणे ग्रामपंचायातीने मंडप उभारून विसर्जनासाठी येणाऱ्या बाप्पांवर पुष्पवृष्टी करण्याची व्यवस्था केली होती.

## गणपती गेले गावाला, चैन पडेना आम्हाला...





(छायाचित्र : समीर मालोदे)

● अनंत चतुर्थीच्या गणपती विसर्जनासाठी अलिबाग समुद्रकिनारी भाविकांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी केली होती.

# दहा दिवसांच्या बाप्पाला भक्तीभावाने निरोप

**रायगड जिल्ह्यातील शहरांसह ग्रामीण भागांत बुधवारी (दि.२७) गणरायाचे गणरायाचे आगमन झाले. यानंतर आता दहा दिवसांच्या बाप्पांना अनंत चतुर्दशीला शनिवारी (दि.६) मोठ्या उत्साहात आणि आंनदी वातावरणात निरोप देण्यात आला. यावेळी पावसाने कृपा केल्यामुळे भक्तगण सुखावले होते. विसर्जन मिरवणुकीदरम्यान शहरांमधील नाक्यांवर आणि गणेशघाटांसह समुद्रकिनारी पोलिसांतर्फे कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी 'गणपती चालले गावाला, चैन पडेना आम्हाला, 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' या घोषणांत बाप्पांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.**



● मुरुड जवळील वाणदे शिघ्रे गावातील दहा दिवसांच्या बाप्पाची हिरवाईतून वाजत गाजत मिरवणूक काढून भावपूर्ण विसर्जन करण्यात आले. (छायाचित्र : सुधीर नाझरे)





## मुरूडमध्ये बाप्पाचा जयघोष

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरूड शहरासह पंचक्रोशीतील गणेश विसर्जन सोहळा ढोल ताशांच्या गजरात मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी 'एक दोन तीन चार, गणपतीचा जयजयकार', 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर' या घोषणांनी मुरुड शहरासह ग्रामीण भाग दुमदुमले होते. यावेळी सजवलेल्या वाहनांमधून गणरायांना शिघ्रे, अंबोली नदी व मुरुड समुद्रकिनारी विसर्जनासाठी नेण्यात आले. मुरुड-जंजिरा नगरपरिषदेच्यावतीने शहरातील नाक्यांसह विसर्जनस्थळी रोषणाई व मुर्ती विसर्जनासाठी जीवरक्षकांची नेमणूक करण्यात आली होती. यावेळी मुरूडमधील हजारोंच्या संख्येने गणरायांना निरोप देण्यात आला. तसेच, विसर्जन सोहळ्यादरम्यान अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस मकरंद पाटील यांनी जागोजागी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. तसेच, मुरुड तहसीलदार आदेश डफल देखील प्रत्येक हालचालींवर लक्ष ठेवून होते.



## गणेश घाटावर भक्तांची गर्दी



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या गणेश विसर्जन सोहळ्याला हजारो भक्तांनी गर्दी केली होती. १९९५ मध्ये नेरळ ग्रामपंचायतचे तत्कालीन सरपंच सावळाराम जाधव यांनी येथील ब्रिटिश कालीन धरणावर गणेश घाट बांधून गणेश विसर्जन सोहळा सुरू केला होता. त्या ठिकाणी नेरळ ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विजेची रोषणाई तसेच शामियाना उभारून तेथे पुष्पवृष्टी करण्याचा उपक्रम सुरू आहे. गेली ३० वर्षे नेरळ ग्रामपंचायतीकडून गणेश विसर्जन सोहळा आयोजित करण्यात येत आहे. यावेळी ज्येष्ठ नागरिक आणि लोकप्रतिनिधी आणि राजकीय मंडळी आवर्जून उपस्थित होते.

## उल्हास नदीवर रंगला सोहळा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील दहिवली मालेगाव येथील उल्हास नदीवर गणेश विसर्जन सोहळा आयोजित केला होता. यावेळी उल्हास नदीमधील वाहत्या पाण्यामध्ये ५००हून अधिक गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. दहिवलीतर्फे वरेडी ग्रामपंचायतीचे माध्यमातून मागील तीन वर्षापासून शामियाना उभारून गणेश विसर्जन सोहळा साजरा केला जात आहे. कर्जत पंचायत समितीचे माजी सभापती अमर मिसाळ यांच्यातर्फे उल्हास नदीवरील गणेश घाटावर विसर्जन सोहळा साजरा करण्यास सुरुवात झाली. गणेश भक्तांच्या करमणुकीसाठी भक्ती गीतांचा कार्यक्रम देखील पाच वाजल्यापासून रात्री अकरापर्यंत सुरू होता.



## म्हसळ्यात उत्साही वातावरणात विसर्जन



**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

म्हसळा तालुक्यातील दहा दिवसांच्या बाप्पांचे विसर्जन शांततेत आणि उत्साही वातावरणात करण्यात आले. तालुक्यातील सुमारे ३५० घरगुती आणि म्हसळा शहरातील बंजारी समाजाचा एकमेव सार्वजनिक गणपतींना भावपूर्ण निरोप देण्यात आला. त्यामध्ये म्हसळा शहरातील सुरई, आदिवासी वाडी व गौळवाड़ी येथील सुमारे ७५ बाप्पांचा समावेश होता. उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदिप कहाले आणि उपनिरीक्षक एडवळे यांनी सर्वत्र चोख पोलीस बंदोबस्त तैनात ठेवला होता. विसर्जन स्थळी नगरपंचायतीने विद्युत दिव्यांची व्यवस्था केली होती.

## विसर्जनादरम्यान पावसाची हजेरी

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

दीड आणी पाच दिवसांच्या गणपती विसर्जनावेळी पावसाने हजेरी लावल्यामुळे गणेश भक्तांची तारांबळ उडाली होती. मात्र, शनिवारी अनंत चतुर्दशीला होणाऱ्या गणपती विसर्जनादरम्यान पावसाची शक्यता असल्याने विषेष काळजी घेण्यात आली होती. यावेळी



अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठीक-ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. विसर्जन मिरवणुकीत लहान मुले ढोल ताश्यांच्या ठेक्यावर नाचतांना तल्लीन झाली होती. आरत्या आणि गाण्यांच्या तालावर बाप्पाला निरोप द्यायला निघालेल्या भक्तांनी बाप्पांच्या मिरवणुकीत खंड म्हणून छत्रीचा आधार घेतला.



● 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या गजरात, प्रत्येक डोळ्यात प्रतिमा साठवून बाप्पाला निरोप दिला. (छायाचित्र : राजेश डांगळे )




● बोर्ली पंचतन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या बोर्लीच्या राजाची गुलालाच्या उधळणीत निघालेली विसर्जन मिरवणूक. (छायाचित्रः अमेय नाझरे)

**पोयनाड आणि अलिबाग सोलर ऑफिसकरिता excel, word आणि संगणकाच ज्ञान असलेले स्टाफ हवेत. आकर्षक सॅलरी १५,००० ते २०,०००. संपर्क- ८४८३९९९२२९, ९०२१४०८५६७**

# सरकारातले टगे

अजित पवार यांच्यावर टगेगिरीचा आरोप आज पहिल्यांदा झालेला नाही. खूप पूर्वी दोन काँग्रेसचे सरकार असतानाही तो कायम होत असे. त्याच वेळी त्यांनी एकदा सांगितले होते की होय, मी टग्या आहे. त्यांचे म्हणणे असे होते नोकरशाहीकडून काम करून घेण्यासाठी आणि विकास करण्यासाठी टगेगिरी करावीच लागते. त्या टगेगिरीमुळे ते अनेकदा अडचणीत आले. एकदा धरण आटलं तर मी काय करू असे म्हणून त्यांनी जे वक्तव्य केल्यानंतर ते स्वतःच यशवंतरावांच्या समाधीपुढे प्रायश्चित्तासाठी बसले होते. तरीही त्यांचा मूळ स्वभाव काही जात नाही. गेल्या आठवड्यात सोलापूर जिल्ह्यातील महिला पोलिस अधिकारी अंजना कृष्णा यांना कारवाई थांबवण्यासाठी त्यांनी जे धमकावले त्याचा व्हिडिओ आता सगळीकडे पसरला आहे. माढा तालुक्यात शेतरस्त्यासाठी गावकरी तळ्यातला मुरुम काढत होते. महसूल प्रशासनाने याला आक्षेप घेतला. अंजना कृष्णा व पोलिस त्यांच्या मदतीसाठी गेले होते. तेव्हा गावकऱ्यांमधील राष्ट्रवादीच्या बाबा जगताप यांनी थेट दादांना फोन लावला व अंजना यांच्या हातात दिला. दादांनी कारवाई थांबवायला सांगितली तेव्हा त्यांनी दादांना आपल्या मोबाईलवर फोन करायला सांगितले. कारण, दादांचा आवाज काढून भलताच माणूस तर बोलत नाही ना याची खातरजमा त्यांना करायची होती. ते पूर्णपणे रास्त होते. त्यावर दादांनी तुझी इतकी डेरिंग, मी तुझ्यावर कारवाई करू शकतो अशी एकेरीची भाषा वापरली. हे अत्यंत आक्षेपार्ह होते. पोलिस हे नियमानुसार ते संरक्षणासाठी गेले होते. ते स्वतः कारवाई करीत नव्हते. तरीही दादांनी त्यांना धमकावण्याचा प्रयत्न केला. आता ते सारवासारव करण्याचा प्रयत्न करीत आहेत. पण बूंद से गई वो हौद से नही आती. कल्पना करा, ज्या गावकऱ्यांवर कारवाईसाठी पोलिस गेले आहेत त्यांच्यातला एक जण थेट फोन करतो आणि मंत्री त्या गावकऱ्यांच्या देखतच अधिकाऱ्यांना झापतो. हिंदी सिनेमात दाखवतात तसा हा सगळा प्रसंग. यातून त्या पोलिस अधिकाऱ्याची आपण काय किंमत ठेवतो व पुढील वेळी जनता नोकरशाहीला जुमानेल का याचा विचारही मंत्री करीत नाहीत.

## बेकायदा वागण्याची शिकवण

हे काही आजच घडत आहे असे नव्हे. पण महायुती सरकारकडे पाहिल्यास याचा सगळा कारभारच टगेगिरीचा असल्याचे दिसून येईल. लाडकी बहीण योजना हा त्याचा सर्वात मोठा व ढळढळीत पुरावा आहे. विधानसभा निवडणुका जिंकण्यासाठी तेव्हाच्या शिंदे सरकारने सरसकट सर्व अर्ज मंजूर करा असा अलिखित आदेश दिला असावा असे मानायला भरपूर जागा आहे. तसे नसते तर, २६ लाख इतक्या प्रचंड संख्येने अपात्र महिलांना या योजनेत पैसे दिले जाऊच शकले नसते. त्यातही काही हजार सरकारी कर्मचारी आहेत व आणखी काही हजार पुरुष अर्जदार आहेत. येईल तो अर्ज मान्य करा व पैसे वाटा असेच त्यावेळचे धोरण असावे हे यावरून दिसते. नोकरशाहीला यात स्वतःला काहीच लाभ नव्हता. त्यामुळे ती स्वतःहून बेकायदा काम करण्याची काहीच शक्यता नाही. म्हणजेच, याबाबत वरच्या अधिकाऱ्यांना याबाबत तोंडी सूचना असाव्यात. या सूचना सर्व मंत्र्यांनी दिलेल्या असाव्यात. ही शुध्द टगेगिरीच होती. विशेष म्हणजे आता यातल्या सरकारी कर्मचारी व पुरुष अर्जदार वगळता इतर गुन्ह्यांना माफी देण्यात आली आहे. नोकरशाहीलाच बेकायदा काम करण्याची सवय लावण्यांचा गुन्हा यात घडला. याबाबत कोणताही खटला झाला नाही व सरकारने दिलगिरीही व्यक्त केलेली नाही. अलिकडे मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनात पहिले दोन दिवस आंदोलकांना अन्नपाणी मिळू नये अशी व्यवस्था करण्यात आली. स्वच्छतागृहांना कुलुपे लावण्यात आली. हे सर्व सरकारातील टग्यांच्या आदेशानेच झाले हे स्पष्ट आहे. याच टग्यांनी तीन वर्षापूर्वी आंतरवाली सराटीतील आंदोलकांवर लाठीमाराचे आदेश दिले होते व त्यातूनच पुढचे कांड घडले. काही दिवसांपूर्वी छळाला कंटाळून संभाजीनगरहून आलेल्या एका विवाहित मैत्रिणीला आसरा दिला या कारणावरून तीन दलित मुलींच्या घरात घुसून पोलिसांनी त्यांना पकडून नेले होते, शिवीगाळ केली होती. नंतर या मुली एट्रॉसिटीची केस दाखल करू पाहत असता ती दाखल करून घेण्यास नकार दिला होता. हे सर्व सरकारातील टग्यांच्या पाठिंब्यावरच चालू होते.

## नियम कोणालाच नकोत

विशाळगडला मुस्लिम अतिक्रमणे आहेत असा कांगावा करून हिंदुत्ववादी गुंडांनी जेव्हा हैदोस घातला तेव्हा त्यांच्यावर कारवाई न करण्याचे आदेशही सरकारातील टग्यांनीच दिला होता. या गुंडांपैकी एकाला पोलिसांनी फरार घोषित केलेले असतानाही तो खुशाल साखरपुडा व लग्न करीत होता. निवडणुकांच्या आधी एका कीर्तनकार इसमाने पैगंबरांविषयी अनुद्गार काढल्याने नगर व नाशिक भागात तणाव होता. त्याच दिवशी संध्याकाळी एकनाथ शिंदे तेथे पोचले व त्यांनी त्या कीर्तनकाराचे जाहीर कौतुक केले. याने पोलिस अधिकाऱ्यांना काय तो योग्य संदेश गेला असेलच. त्यामुळे टगेगिरी करणारे अजितदादा एकटे नाहीत व पहिलेदेखील नाहीत. किंबहुना, विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहुमत मिळाल्यापासून आपण म्हणू तो कायदा हा या सरकारातील टग्यांचा समज आणखी पक्का झाला असावा. अधिकाऱ्यांनी लोकांना काय वाटेल ते करू द्यावे, कारण, अंतिमतः तेच म यबाप मतदाते आहेत अशी बहुदा सरकार चालवणाऱ्यांची भावना झालेली दिसते. पण मंत्री म्हणून कायद्याच्या रक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर आहे. तशी शपथ त्यांनी घेतलेली आहे. जनतेची खुशामत करणे नव्हे तर कायदा व नियमानुसार वागणे व आवश्यक तेव्हा जनतेलाही शिस्त लावणे हे सरकारकडून अपेक्षित आहे. पण जे स्वतःच रोजच्या रोज इतक्या बेकायदा गोष्टी करायला नोकरशहांना सांगत असतील त्यांच्याकडून अशा शिस्तीची अपेक्षा व्यर्थ आहे. नोकरशहा व पोलिस हेदेखील धुतल्या तांदळासारखे नसतातच. त्यांनाही ही व्यवस्था सोईची असते. यात त्यांनाही हात मारता येतो. त्यांची एरवीची पापे व अकार्यक्षमता धुतली जाते वा त्यांच्यावर पडदा पडतो. तिसरीकडे जनतेलाही कायदा पाळण्यापेक्षा तात्पुरता फायदा करणारे असे निर्णय झालेले आवडतात. या प्रकरणातील मुरुम काढण्याचा विषय घ्या. हा नेहमीच वादग्रस्त मुद्दा आहे. महसुली विभागाला यात कर वसूल करायचा असतो. त्यांनाही टार्गेट ठरवून दिलेली असतात. शिवाय नियमांचा प्रश्न असतोच. पण गावातल्या लोकांना मुरुम खोदाई हा हक्क वाटतो व पैसे द्यायला नको वाटते. त्यातून वाद होतात. अशा वेळी सरकारातील मंडळींनी कायदा पाळणे का आवश्यक आहे हे गावकऱ्यांना समजावले पाहिजे. पण लाडकी बहीण व वर दिलेल्या तमाम प्रकरणांमुळे त्यांनी तो अधिकार केव्हाच गम ावलेला असतो. शिवाय त्यांना या लोकांची मतेही हवी असतात. मग जे नियम पाळू मागतात त्यांच्यावर टगेगिरी केली जाते.

विचार

# रिॲल्टी झळाळली, सोनेसाठे सापडले

*दिलासादायी अर्थवृत्तांनी सरत्या आठवड्यात अर्थविश्व गाजवले. येत्या काळात घरखरेदी वाढणार असल्याचे संकेत असताना परवडणाऱ्या घरांचे स्वप्न अधुरे राहणार असल्याचे चित्र समोर आले. जीएसटीमध्ये सवलत मिळणार असली तरी सुधारणांमुळे आठ राज्यांचे नुकसान होणार असल्याचे वास्तव समोर आले. तिकडे अमेरिकेचा खास सहकारी असलेल्या जपानने अमेरिकेला मोठा धक्का देणेही अनेकांच्या भुवया उंचावून गेले.*



महेश देशपांडे

काहिसा अंतर्विरोध असणाऱ्या बातम्यांनी सरत्या आठवड्यात अर्थविश्व गाजले. येत्या काळात घरखरेदी वाढणार असल्याचे संकेत मिळत असताना परवडणाऱ्या घरांचे स्वप्न अधुरे राहणार असल्याचे चित्र समोर आले. जीएसटीमध्ये सवलत मिळणार असली तरी सुधारणांमुळे आठ राज्यांचे नुकसान होणार असल्याचे वास्तव समोर आले. तिकडे अमेरिकेचा खास सहकारी असलेल्या जपानने अमेरिकेला मोठा धक्का देणेही अनेकांच्या भुवया उंचावून गेले.

भारतातील गृहनिर्माण क्षेत्राला नेहमीच सणासुदीचा हंगाम नवा उत्साह आणि चालना देतो. गणेशोत्सवापासून दिवाळीपर्यंतचा कालावधी पारंपरिकदृष्ट्या घर खरेदीसाठी शुभ मानला जातो आणि या काळात खरेदीदार मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतात. यंदाही हाच कल कायम राहणार असून २०२५ च्या चौथ्या तिमाहीमध्ये घरांच्या वार्षिक विक्रीत किमान ३० टक्के वाटा असेल, असा अंदाज आहे. 'आरईए इंडिया हाऊसिंग डॉटकॉम'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण शर्मा यांनी सांगितले की २०२५ ची पहिली सहामाही तुलनेने संथ राहिली होती. सलग दोन वर्षांच्या दमदार वृद्धीनंतर बाजारात दुरुस्तीचा टप्पा होता, तरीदेखील ऐतिहासिक आकडेवारी दर्शवते की सप्टेंबर ते डिसेंबर हा कालावधी घरांच्या मागणीत नेहमीच सुधारणा घडवतो. त्यामुळेच २०२५ ची चौथी तिमाही केवळ मोसमी वाढच घेऊन येणार नाही, तर २०२६ पर्यंतच्या गृहनिर्माण क्षेत्राला चालना देणारी ठरेल. २०२५ च्या पहिल्या सहामाहीमध्ये रिअल इस्टेट मार्केट काहीसे शांत होते; मात्र वाढलेला ग्राहक आत्मविश्वास, मध्यम आणि प्रीमियम सेगमेंटमधील सातत्यपूर्ण मागणी आणि लाइफस्टाइलवर आधारित प्रकल्पांचे वाढते आकर्षण यामुळे खरेदीदारांमध्ये नवा उत्साह दिसून येतो आहे.

सणासुदीच्या हंगामात विकासक मोठ्या प्रमाणावर नवीन प्रकल्प बाजारात आणत आहेत. आकर्षक सवलती, लवचिक पेमेंट योजना आणि मार्केटिंग मोहिमा यामुळे खरेदीदारांना निर्णय घेणे सोपे होत आहे. या काळात अनेक कुटुंबे त्यांच्या पहिल्या घराच्या खरेदीचा निर्णय घेतात, तर गुंतवणूकदारही दीर्घकालीन नफ्याचा विचार करून रिअल इस्टेटकडे वळतात. विशेष म्हणजे अगदी आव्हानात्मक काळातही चौथ्या तिमाहीने बाजाराला दिलासा दिला. उदाहरणार्थ, २०२० मध्ये कोविडच्या धक्क्यानंतरही या तिमाहीत तिसऱ्या तिमाहीच्या तुलनेत तब्बल ३२ टक्के वाढ झाली होती. त्यामुळेच यंदाही २०२५ च्या चौथ्या तिमाहीमध्ये बाजारात लक्षणीय सुधारणा होईल आणि २०२६ साठी ठोस पाया रचला जाईल, असा अंदाज वर्तवला जात आहे. यामुळे २०२५ च्या अखेरीस गृहनिर्माण बाजार पुन्हा एकदा गतिमान होईल आणि चौथी तिमाही 'टर्निंग पॉइंट' ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

देशाच्या शहरी भागात परवडणाऱ्या घरांचा अभाव ही एक गंभीर समस्या बनत आहे. एका नवीन अहवालानुसार भारतात परवडणाऱ्या घरांची मागणी वाढत आहे; परंतु ती बांधण्याची गती खूपच मंदावली आहे. त्यामुळे या क्षेत्रात मोठे असंतुलन निर्माण झाले आहे. तीन घरांच्या पार्श्वभूमीवर परवडणाऱ्या किमतीत फक्त एक घर उपलब्ध आहे. 'नाईट फ्रँक इंडिया' ही रिअल इस्टेट कंपनी आणि 'नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल'च्या अहवालात म्हटले आहे की देशातील आठ मोठ्या शहरांमध्ये मुंबई, दिल्ली-एनसीआर, बंगळुरू, हैदराबाद, चेन्नई, पुणे, कोलकाता आणि अहमदाबादमध्ये परिस्थिती चिंताजनक आहे. २०१९ च्या सुरुवातीला, जिथे प्रत्येक घराच्या म ागणीनुसार एकापेक्षा जास्त घरे बांधली जात होती, तिथे २०२५ च्या पहिल्या सहामाहीमध्ये जूनपर्यंत हा आकडा ०.३६ पर्यंत घसरला आहे. याचा अर्थ मागणीच्या तुलनेत फक्त एक तृतीयांश घरे बांधली जात आहेत. 'एनएआरईडीसीओ'चे अध्यक्ष जी. हरी बाबू म्हणाले की भारतात परवडणाऱ्या घरांच्या कमतरतेची समस्या पुन्हा एकदा समोर आली आहे. सध्या देशात परवडणाऱ्या ९४ लाख घरांची कमतरता आहे. ती २०३० पर्यंत तीन कोटी इतकी वाढू शकते. परवडणाऱ्या घरांची मागणी वाढत आहे; परंतु त्यांची संख्या कमी होत आहे ही चिंतेची बाब आहे. याशिवाय खासगी कंपन्यांची गुंतवणूकदेखील खूप कमी आहे. त्यामुळे ही समस्या आणखी वाढत आहे.

दरम्यान, विरोधी पक्षांच्या ताब्यातील आठ राज्यांचे म्हणणे आहे की वस्तू आणि सेवा करातील स्लॅबची पुनर्रचना करण्याच्या सरकारच्या प्रस्तावामुळे सर्व राज्यांना दर वर्षी सुमारे १.५ लाख कोटी ते २ लाख कोटी रुपयांचे महसूल नुकसान होईल. अशा परिस्थितीत, केंद्राने पाच वर्षांसाठी या नुकसानाची भरपाई करावी, अशी मागणी होत आहे. कर्नाटक, हिमाचल प्रदेश, झारखंड, केरळ, पंजाब, तामिळनाडू आणि तेलंगणातील मंत्र्यांनी तसेच पश्चिम बंगाल सरकारच्या प्रतिनिधीने कर कपातीनंतर नफा कमावण्यापासून रोखण्यासाठी एक यंत्रणा तयार करण्याची मागणी केली आहे. त्यामुळे व्यवसायांना फायदा होईल. राज्यांनी सुचवले आहे की सध्याच्या कर स्लॅबमधून मिळणारे उत्पन्न राखण्यासाठी ४० टक्के स्लॅबव्यतिरिक्त लक्झरी आणि व्यसनांच्या वस्तूंवर अतिरिक्त शुल्क लावावे. यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा काही भाग राज्यांमध्ये वाटून त्यांना होणाऱ्या महसुली नुकसानाची भरपाई करावी. या सर्व राज्यांनी जीएसटी परिषदेच्या पुढील बैठकीत आपला प्रस्ताव सादर करण्याचा निर्णय घेतला आहे.

महसुली नुकसानीमुळे राजकोषीय रचनेत अस्थिरता निर्माण होईल. केंद्राने दरांचे तर्कसंगतीकरण केल्यामुळे महसुली नुकसानीचा अंदाज लावलेला नाही. कर्नाटकचे अर्थमंत्री कृष्णा बायरे गौडा म्हणाले की प्रत्येक राज्याला त्यांच्या सध्याच्या जीएसटी महसुलाच्या १५-२० टक्क्यांपर्यंत नुकसान होण्याची शक्यता आहे. दरांमध्ये कपात झाल्यानंतर कर महसुलात वाढ होईल, हा दावाही त्यांनी फेटाळून लावला. त्यांच्या मते जीएसटी महसुलात वीस टक्के कपात केल्याने देशभरातील राज्य सरकारांची राजकोषीय रचना अस्थिर होईल. राज्यांना पाच वर्षांसाठी भरपाई दिली पाहिजे, जी महसूल स्थिर होईपर्यंत वाढवता येईल. पंजाबचे अर्थमंत्री हरपाल सिंग चीमा यांनीही अशी मागणी केली आहे. त्यांच्या मते नफेखोरी शोधण्यासाठी एक यंत्रणा तयार करावी, जेणेकरून दरांच्या तर्कसंगतीकरणाचा फायदा सामान्य माणसापर्यंत पोहोचू शकेल. या राज्यांनी महसूल संवर्धन मोजण्यासाठी आधार वर्ष २०२४-२५ निश्चित करण्याची मागणीही केली आहे.

आता एक लक्षवेधी बातमी. जपानने अमेरिकेबरोबरचे ५५० अब्ज डॉलरचे मेगा डील अचानक थांबवले आहे. गुंतवणूक करारासाठी जपानचे वाणिज्य सल्लागार रयोसेई अकाजावा हे गुरुवारी अमेरिकेला जाणार होते; पण अखेरच्या क्षणी त्यांचा दौरा रद्द झाला. अमेरिकेने जपानवर २५ टक्के आयात शुल्क लावले आहे. जपानने अमेरिकेत ५५० अब्ज डॉलरची गुंतवणूक केल्यास १५ टक्के आयात शुल्क कमी करण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले होते. त्यासाठी अकाजावा हे अमेरिकेला जाणार होते; पण त्याच वेळी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी बेताल वक्तव्य केले. आता जपानने जी ५५० अब्ज डॉलरची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे, तो पैसा अमेरिकेचा आहे; आम्ही त्याचा हवा तसा वापर करू, असे ते म्हणाले. त्यामुळे ठिणगी पेटली. जपानने शेवटच्या टप्प्यात अकाजावा यांचा दौरा रद्द केला.

आयात शुल्काआडून अमेरिका जपानच्या कृषीजगतात घुसखोरी करू इच्छित होता. एक हक्काची बाजारपेठ मिळावी, यासाठी ट्रम्प प्रयत्न करत होते. अमेरिकेचा तांदुळ जपानच्या बाजारात यावा, यासाठी हे प्रयत्न सुरू होते. जपानच्या शेतकऱ्यांचा या अमेरिकन तांदळाला विरोध आहे. जपानच्या बाजारात अमेरिकन तांदळाची आयात नको, अशी मागणी मार्चपासून होत होती. आयात शुल्क कमी करण्यासाठी जपान सरकार तयारही झाले होते. ट्रम्प यांनी भावना दुखावल्याने जपानने ऐन वेळी या कराराला वाटण्याच्या अक्षदा लावल्या. जपानी लोक हे चिकट भात खाण्यावर भर देतात. तांदळाशी जपानी लोकांचे सांस्कृतिक नाळ जोडलेली आहे. तांदळाविषयी या देशात आदरभाव आहे. जपानमध्ये तांदळाची आयात होते; पण अमेरिकन तांदळाला सर्वाधिक विरोध आहे. जादा आयात शुल्क लावल्यापासून जपानने अमेरिकन तांदळाची आयात घटवली आहे, तर दुसरीकडे भारताच्या तांदळाची जपानमधील आयात गेल्या दोन वर्षात वाढली आहे. ही आयात जवळपास दुप्पट झाली आहे. गेल्या वर्षी जपानने भारताकडून ५.७४ मिलियन डॉलर(५०,६२,५४,२२४ रुपये) किंमतीच्या तांदळाची खरेदी केली होती.

चर्चा आजची

# 'चुकले आमचे काही त्याची क्षमा असावी'

संतोष राऊळ

गेले वर्षभर वाट पाहत असलेल्या गणेशोत्सवाचे दहा दिवस कधी संपले कळलंच नाही. यंदा २७ ऑगस्ट रोजी बाप्पाचे आगमन झाले आणि शनिवारी (दि.७) अनंत चतुर्दशी गणपतींचे विसर्जन देखील झाले. यावेळी बाप्पाला निरोप देताना चिमुकल्यांसह थोरांपर्यंत सर्वच भावुक झाले होते. सर्वत्र बाप्पाचे दर्शन आनंदात आणि वेळेत पुर्ण झाले. परंतु, यावेळी चर्चेचा विषय ठरले ते लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ. कारण तांत्रिक अडचणींमुळे लालबागच्या राजाचे विसर्जन खुपच लांबले गेले. त्यामुळे गणेशभक्तांमधून काही प्रमाणात नाराजीचे सुर उमटत होते.

गणेशोत्सव म्हटलं की संपुर्ण महाराष्ट्र राज्यात उत्साहाचे वातावरण असते. विशेष करून पुणे आणि मुंबईत. कारण याच दोन शहरांत लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करण्यात आले होते. आज दोनाची शेकडो गणेशोत्सव मंडळे प्रस्थापित झाली आहेत. प्रत्येक मंडळाचे एक वेगळेपण आहे. मुंबईतील गिरगांवमधील केशवजी नाईकांच्या चाळीत १३३ वर्षांपूर्वी सार्वजनिक गणेशोत्सवाचे मुळ रोवण्यात आले होते. त्यानंतर तेथीलच आज लोकमान्य गणेश नावाने ओळख असलेल्या गणेशोत्सव मंडळासह अनेक मंडळे आजही गणेशोत्सव त्याच उत्साहात साजरा करत आहेत. मात्र, आज खरं वैभव प्राप्त केलं आहे ते लालबाग-परळ मधील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी. ज्या मंडळांनी लोकमान्य टिळकांची प्रेरणा घेऊन बाप्पाची स्थापना केली ती मंडळे आजही लोकमान्य टिकळांची प्रतिमा आपल्या मंडळात लावतात. परंतु, ज्यांनी नवसाने बाप्पाची स्थापना केली अशा ठिकाणी फार कमी टिळकांच्या प्रतिमा दिसतात. ज्या-ज्या ठिकाणी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जातो त्या ठिकाणी टिळकांच्या विचारांचा प्रचार होणे गरजेचे आहे. कारण आज जे मंडळांकडे वैभव आहे ते केवळ टिळकांच्या प्ररणेमुळेच, हे त्यांनी विसरता कामा नये. लालबाग-परळ ही गणेशभक्तांची पंढरी मानली जाते. कारण या ठिकाणी बाप्पाची उंचच उंच मुर्ती घडवली जाते. त्याचबरोबर लालबागचा राजा, मुंबईचा राजा, चिंचपोकळीचा चिंतामणी, परळचा राजासह अनेक प्रसिद्ध गणपती या दहा दिवसांत बसवले जातात. त्यांची प्रसिद्धी महाराष्ट्रासह जगभरातच आहे. त्यातील काही बाप्पांच्या मुर्ती जागेवर घडविल्या जातात. त्यात लालबागचा राजा आणि मुंबईचा राजा या मुर्तींचा समावेश आहे. त्यांचे आगमन होत नाही. मात्र, या गणपतींच्या विसर्जनाला खुप मोठी गर्दी होते. त्यामुळे या गणपतींचे विसर्जन देखील दुसऱ्या दिवशी सकाळी होते. त्यात लालबागचा राजा हा नवसाचा गणपती आहे. त्यामुळे राजाच्या दरबारी गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत प्रचंड प्रमाणात गर्दी असते. लालबागच्या राजाचे मुख दर्शन घेण्यासाठी किमान तीन तास तरी रांगेत जातात. आणि चरणस्पर्शला तर वेळेची मर्यादाच राहत नाही. सहा ते सात तास कधी जास्त वेळ रांगेत उभं राहून काही सेकंदच बाप्पाचं दर्शन मिळतं. दर्शनासाठी त्या ठिकाणी अरेरावी देखील होते. त्यामुळे लालबागच्या राजाच्या नावाला नकळत गालबोट लागत आहे. त्यामुळे गणेशभक्तांची नाराजी होत आहे. त्यातच लालबागच्या राजाची शनिवारी दुपारी १२ वाजता सुरू झालेली विसर्जन मिरवणूक रविवारी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास गिरगांव चौपाटीवर पोहोचली होती. परंतु, ३० तासांहून अधिक काळ लोटला तरी देखील बाप्पाचे विसर्जन झाले नव्हते. याला कारणीभुत ठरले ते अत्याधुनिक गुजराती तराफा. कारण हा तराफा भरतीच्या पाण्यात कुचकामी ठरला. प्रचंड भरती असल्याकारणाने तराफा पाण्यावर तरंगत होता आणि लालबागचा राजाची मूर्ती पाण्याने भिजल्याने जड होऊन तराफ्याच्या समतल भागापासून खाली होती. लालबागचा राजा मंडळाच्या सदस्यांनी प्रचंड प्रयत्न केले, परंतु त्यांना बाप्पा त्या तराफ्यावर चढवणे शक्यच झाले नाही. दरवर्षी नेण्यात येणाऱ्या तराफ्यातून नेताना असा प्रसंग कधीच ओढावला नव्हता. परंतु, या घटनेमुळे लालबागच्या राजाची स्थापना करणाऱ्या कोळी बांधवांसह सर्व गणेशभक्तांमध्ये नाराजीचे सुर उमटले होते. लालबागचा राजा बराच काळ समुद्रात एकाच ठिकाणी उभा राहिलेला पाहून सर्वांची मनं दुखावली जात होती. अखेर सायंकाळी पाच-सहा वाजण्याच्या दरम्यान समुद्राला ओहोटी लागली आणि लालबागचा राजा त्या अत्याधुनिक तराफ्यावर विराजमान झाला. तेव्हा सर्वांच्या जिवात जिव आला. परंतु, तरी देखील विसर्जनाची समस्या होतीच. आता जोपर्यंत पुर्ण भरती लागत नाही तोपर्यंत लालबागच्या राजाचे विसर्जन करण्यासाठी खोल समुद्रात जाता येणार नव्हते. त्यामुळे रात्री उशीरापर्यंत लालबागच्या राजाला आपल्या गावी जाण्याची वाट पाहावी लागली. त्यामुळे दर्शनासाठी वाट पाहायला लावणाऱ्या लालबागचा राजा गणेशोत्सव मंडळाच्या सदस्यांना स्वतः राजानेच विसर्जनासाठी वाट पाहायला लावलं, असं प्रत्येक गणेशभक्ताकडून बोलले जात आहे. यावेळी लालबागच्या राजाचे व्यवस्थित विसर्जन होण्यासाठी 'चुकले आमचे काही त्याची क्षमा असावी' असे म्हणत राजाला साकडे घालण्यात येत होते. तसेच, यंदा घडलेल्या मंडळाच्या चुकांचे पुढील वर्षी निरसन होईल, या आशेवर राजा विसर्जनाला तय्यार झाला असावा, असे देखील गणेशभक्तांकडून बोलले जात आहे.

लोकसंसद

## छत्रपतींच्या स्वराज्यात धर्माधारित वसाहत होणे योग्य की अयोग्य

मुंबईपासून ७० किलोमीटर अंतर असलेल्या कर्जत शहरात सुकून एम्पायर नावाची केवळ मुसलमानांसाठीची एक वसाहत बांधण्यात येत आहे. येथे हलाल जीवनशैली विकसित केली जाणार आहे. विशेष म्हणजे याला रेरा म्हणजेच रियल इस्टेट रेग्युलेशन अँड डेव्हलपमेंट कायद्याच्या अंतर्गत प्रशासनाने संमती दिली आहे. हलाल जीवन शैली म्हणजे इस्लामच्या नियमानुसार अनुमती असणारी गोष्ट. धर्माधिरित वसाहती बांधणे हे संविधानाच्या तत्वांची पायमल्ली करण्यासारखेच आहे सरकार जर याला अनुमती देत असेल तर ही अत्यंत चिंतेची बाब आहे. कर्जत शहरात ८०% हिंदू आहेत व १३% मुसलमान आहे. सुकून एम्पायर सारख्या वसाहती निर्माण झाल्या आणि त्यातून मुसलमानांचे किंवा घुसखोरांचे संघटन झाले तर हे प्रमाण उलट होण्यास वेळ लागणार नाही. हलाल प्रमाणित वसाहती म्हणजे मुसलमानांसाठी एक प्रकारे पायघड्या घालण्यासारखे आहे. राज्यात अनेक असे भाग आहेत जिथे कधीकाळी हिंदू बहुल वस्ती होती पण आता तिथे मुसलमान बहुल वस्त्या झाल्या आहे. आम्हाला हिंदू त्यांच्या वसाहती घर देत नाही, आमच्या समाजासमोर असंख्य प्रश्न अडचणी, संकटे असतात आम्हाला अनेक तडजोडी कराव्या लागतात इकडे आम्हाला सुरक्षित जीवन जगता येईल म्हणून असे निर्णय घ्यावे लागतात मग हिंदूंना संघर्ष नसतो का उलट अनेकदा मुसलमानांकडून अन्याय, अत्याचार, विकृती हे सहन करायचे वासनांद नजरांची शिकार व्हायचे त्यांचा उदमपणा निमूट सहन करायचा हे केवळ आणि केवळ हिंदूच करत असतो. धर्मनिरपेक्ष भारतात धर्माधारित आरक्षण दिले, धर्माधारित सुविधा दिल्या, धर्माधारित कायदे दिले म्हणूनच मुसलमानांनी धर्माधारित अर्थव्यवस्था हलाल चालू केली आणि आता धर्माधारित वसाहत सुकून एम्पायर. भारत सरकारच्या राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने एक पोस्ट प्रसारित केली आहे आणि त्यात ते म्हणतात धर्मा धर्मात भेद करणारे हे बांधकाम म्हणजे एक प्रकारे विष आहे. हे राष्ट्राअंतर्गत मोठे षडयंत्र असून याप्रकरणी सरकारला नोटीस बजावली आहे. मानव अधिकार आयोगाने याची तातडीने नोंद घेतली हे निश्चितच स्तुत्य आहे पण केवळ नोटीस बजावून न थांबता सरकारकडून या प्रकरणात कारवाई होईपर्यंत हे प्रकरण आयोगाने धरून लावायला हवे. ज्या छत्रपती शिवाजी महाराजांनी परकीय आक्रमकांशी लढून हिंदवी स्वराज्य स्थापन केले आणि रायगडाला ज्याची राजधानी बनविले त्या राजधानीत सुकुन एम्पायर उभे राहणे हे धोकादायक आणि लाजिरवाणे आहे.

**- लीना मकरंद गाडगीळ, पनवेल**

दिनविशेष

# 'सूर-ए-मल्लिका' आशा भोसले

मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध पार्श्वगायिका आशा भोसले यांचे नाव संगीतविश्वात मोठ्या आदराने घेतले जाते. या झगमगत्या जगात त्यांनी सात दशकांहून अधिक काळ उत्कृष्ट आणि अगणित काम करून लोकांच्या हृदयात स्थान निर्माण केले आहे. आशा भोसले यांनी प्रत्येक शैलीतील खोडकर आणि रोमँटिक गाणी गाऊन इंडस्ट्रीत मोठे स्थान मिळवले आहे. सुरांची मल्लिका आशा भोसले यांचा ८ सप्टेंबरला वाढदिवस आहे. आशा यांचा जन्म १९३३ मध्ये महाराष्ट्रातील सांगली येथे झाला होता. आशा यांनी वयाच्या १० व्या वर्षी पहिले गाणे गायले. आशा भोसले यांनी १९४८ मध्ये चित्रपटासाठी पहिले गाणे गायले होते. 'चुनरिया' नावाच्या चित्रपटामध्ये 'सावन आया रे' हे गाणे त्यांनी जोहराबाई अंबालेवाली आणि गीता दत्त यांच्यासोबत गायले होते. त्यांनी आतापर्यंत १२ हजारांहून अधिक गाणी गायली आहेत. तब्बल २० विविध भाषा असणाऱ्या १ हजारांहून अधिक चित्रपटांसाठी त्यांनी गाणी गायली आहेत. आशा भोसले यांचा जन्म ८ सप्टेंबर १९३३ ला झाला. त्यांना बालपणापासून गाण्याची आवड होती. १० वर्षांची असताना त्यांनी गाणे गाण्यास सुरूवात केली. पुढे त्यांच्या जादूई आवाजाने प्रेक्षक मनावर रुंजी घातली. आशा भोसले स्वर साम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या लहान बहिण आहेत. त्यांचे वडील दीनानाथ मंगेशकर प्रसिध्द शास्त्रीय गायक होते. वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची सर्व जबाबदारी लता मंगेशकर यांच्यावर आली. बहिणीला साथ देण्यासाठी आशा भोसले यांनी गाणी गाण्यास सुरुवात केली.

लहान असताना लतादीदींना पाहून आशाजी रियाज करायच्या. एकदा लता मंगेशकर शाळेला जात होत्या. त्यावेळी आशा देखील शाळेला जाण्यासाठी तयार झाल्या. त्यावेळी फक्त लतादीदीच शाळेला जायच्या. लतादिदी आशाजींना सोबत घेऊन शाळेत गेल्या. शिक्षक दोघींना पाहून ओरडले. तसेच एका फीमध्ये दोन मुलांचं शिक्षण होत नसल्याचं ते म्हणाले. शिक्षकांनी ओरडल्यानंतर आशा-लता दोघीही रडत घरी परतल्या. दीनानाथ मंगेशकर यांना ज्यावेळी हे समजलं की, आपल्या मुली शाळेसाठी रडल्या आहेत, त्यांना खूप वाईट वाटलं. त्यामुळे अशा शाळेत न पाठवण्याचा निर्णय त्यांनी घेतला; जिथे, शिक्षकच मुलांना रडवतात. आशा भोसले यांच्या आवाजात गोडवा असूनही त्यांचे खासगी आयुष्य कटू गोष्टींनी भरलेलं होतं. त्यावेळी लता मंगेशकर यांना त्यांच्या गाण्यांमुळे बरीच प्रसिद्धी मिळाली होती. त्यांचं काम सांभाळण्यासाठी त्यांचे पर्सनल सेक्रेटरी गणपतराव भोसले होते. ते लतादीदींचं काम सांभाळत असत. गणपतराव यांच्याशी आशा भोसले यांना प्रेम झालं. परंतु, मंगेशकर कुटुंबीय त्यांच्या लग्नासाठी तयार नव्हते. दोघांनी घरातून पळून जाऊन लग्न करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी आशा भोसले १६ वर्षाच्या होत्या आणि गणपतराव ३१ वर्षांचे. दोघांनी लग्न केलं. परंतु, त्यांचं नातं फार काळ टिकलं नाही. गणपतराव यांच्या फॅमिलीने आशा भोसलेंना स्वीकारलं नव्हतं. ते आशाजींना मारहाणही करण्याचा प्रयत्न करत करायचे. शेवटी एके दिवशी गणपतराव यांनी आशा भोसले यांना घराबाहेर काढलं. त्यावेळी आशा भोसले प्रेग्नेंट होत्या. ही माहिती खुद्द आशा भोसले यांनी एका मुलाखतीत दिली होती. सासरमधून बाहेर काढल्यानंतर त्या आपल्या दोन मुले हेमंत आणि वर्षा यांच्यासोबत पुन्हा माहेरी परतल्या होत्या. आशा यांना आतापर्यंत फिल्मफेयर ॲवॉर्डमध्ये ७ बेस्ट फिमेल प्लेबॅक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.


## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

८ सप्टेंबर

१) श्रीम. सरोज वासुदेव शेडगे अलिबाग-रायगड ०८-०९-१९५४

२) श्रीम सुरेखा रत्नाकर कोलते अलिबाग रायगड ०८-०९-१९५९

## सुवर्णकण



**आपल्या हातून जाणून बुजून पापे होता त तशी नकळत देखील पापे होतात जोपर्यंत आपण काम क्रोधादिक शत्रूच्या ताब्यात आहोत तोपर्यंत आपल्या हातून विकारयुक्त कर्मे होतच असतात.**

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


## तिरुअनंतपुरम रेल्वेला थांबा मिळण्याची मागणी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव हे दक्षिण रायगडचे मध्यवर्ती ठिकाण आहे. येथील रेल्वे स्थानकात तिरुअनंतपुरम या रेल्वे गाडीला थांबा मिळण्याची मागणी ॲड. राजीव साबळे यांनी खासदार सुनील तटकरे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. या मागणी बाबत खासदार तटकरे यांनी सकारात्मक विचार करून रेल्वे मंत्री अश्विनी वैश्णव यांच्याकडे आग्रह केला जाईल. त्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील, असे त्यांनी दिले आहे. तिरुअनंतपुरम ते योगनगरी ऋषिकेश या रेल्वे गाडीला केवळ रत्नागिरी आणि पनवेल या ६०० किलोमीटर अंतरात एकही थांबा नाही. या गाडीला माणगाव रेल्वे स्थानकात थांबा मिळाल्यास दक्षिण रायगडमधील माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर, रोहा, मंडणगड, खेड, पाली या तालुक्यातील शेकडो प्रवाशांना लाभ मिळू शकतो, असे शाहनू शहा यांनी सांगितले. त्याचबरोबर या रेल्वेला माणगाव येथे थांबा मिळावा यासाठी गुजरात, राजस्थान, दिल्ली, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश तसेच दक्षिण रायगड येथील रहिवाशांनी मागणी केली आहे. त्यामुळे प्रवाशांना अधिक सोयीस्कर होईल, असे प्रवाशी संघटनेचे सामाजिक कार्यकर्ते शाहनू शहा यांनी ॲड. राजीव साबळे यांच्याकडे मागणी केली होती. त्या दृष्टीने खासदार सुनील तटकरे हे तिरुअनंतपुरम ते योगनगरी ऋषिकेश २२६५९ या रेल्वे गाडीला माणगाव येथे थांबा मिळण्यासाठी आवश्यक प्रयत्न करत आहेत, असे ॲड. राजीव साबळे यांनी सांगितले.

## महाडच्या लौकिकचे यश

**। महाड । प्रतिनिधी ।**



महाडच्या लौकिक सुकाळे याने घवघवीत यश मिळवत देशातील ख्यातनाम व ऐतिहासिक वीर जिजामाता तांत्रिक संस्था, मुंबई येथील मेकॅनिकल इंजिनिअरिंग शाखेत प्रवेश मिळवला आहे. या यशामुळे महाडकरांच्या अभिमानात भर पडली आहे. लौकिक हा महाडातील सुकाळे कोचिंग क्लासेसचे संस्थापक रामचंद्र सुकाळे यांचा नातू असून, त्याने लहानपणापासूनच आपल्या अभ्यासू वृत्ती, मेहनत व बुद्धिमत्तेच्या जोरावर शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली आहे. इयत्ता सहावीत प्रतिष्ठित डॉ. होमी भाभा स्कॉलरशिप प्राप्त करून लौकिकने सुरुवातीपासूनच आपले वेगळेपण दाखवून दिले.

# राजिपचा 'आदर्श शिक्षक' पुरस्कार जाहीर

## जिल्हाभरातील १७ शिक्षकांची निवड

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागामार्फत देण्यात येणारे जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. २०२५/२६ या शैक्षणिक वर्षासाठी जिल्हाभरातील १७ शिक्षकांची निवड आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली असल्याची माहिती रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व प्राथमिक शिक्षण अधिकारी ललिता दहितुले यांनी दिली आहे. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा ५ सप्टेंबर हा जन्म दिवस दरवर्षी शिक्षक दीन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त जिल्हा परिषदेकडून प्राथमिक शिक्षकांना त्यांच्या चांगल्या कामगिरीसाठी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते.

यावेळी २०२५/२६ या शैक्षणिक वर्षासाठी जिल्ह्याभरातील मनोहर पाटील (अलिबाग), किशोर पाटील (पेण), योगिनी वैदू (पनवेल), संज्योती कांबरी (कर्जत), किर्ती धारणे (खालापूर), अजित जोशी (उरण), वृषाली गुरव (सुधागड), प्रसाद साळवी (रोहा), वसंत साळुंखे (महाड), सीमा चव्हाण व नारायण खोपटकर (श्रीवर्धन), शशीकांत भिंगारदेवे (म्हसळा), विजय पवार (पोलादपूर), सुजाता मालोरे व परेश अंधेर (माणगाव), उल्का मोडकर (तळा) आणि हेमकांत गोयजी (मुरुड) यांना जिल्हा आदर्श पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.







सुधागड तालुक्यातील प्राथमिक विभागातून नवघर शाळेच्या वृषाली प्रशांत गुरव या शिक्षिकेची निवड रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्यांना हा पुरस्कार मिळाला असून त्यांच्यावर सर्वत्र स्तरातून कौतुकांचा वर्षाव होत आहे.



पेण तालुक्यातील सोनखार येथील राजीप शाळेचे प्राथमिक शिक्षक किशोर लक्ष्मण पाटील यांना राजिप शिक्षण खात्याचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. मूळचे शिर्कीचाळ येथील रहिवासी असणारे किशोर पाटील यांचे शैक्षणिक कार्य, सामाजिक कार्य क्रीडा क्षेत्रातील कार्य व संघटनात्मक कार्य कौतुकास्पद असून इतरांसाठी प्रेरणादायी आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे विविध शिक्षक संघटना तसेच शिर्की पंचक्रोशी तसेच शिक्षक वर्गाकडूनअभिनंदन केले जात आहे.



उरण तालुक्यातील पिरकोनचे शिक्षक अजित जोशी यांना रायगड जिल्हा परिषदे तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार मिळणार असल्याचे जाहीर झाले आहे. आदर्श शिक्षक पुरस्कार जाहिर झाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून कौतुकांचा, शुभेच्छांचा अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवरांनी प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहेत.



अलिबाग तालुक्यातील सुडकोळी राजिप शाळेचे शिक्षक व दिवी पारंगी गावाचे रहिवाशी मनोहर महादेव पाटील यांना जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यामुळे त्यांच्यावर सर्व स्तरातून कौतुक होत आहे.



कर्जत तालुक्यातील माणिवली येथील जिल्हा परिषद शाळेच्या उप शिक्षिका संज्योती कांबरी यांना आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. रायगड जिल्हा परिषदेत शिक्षिका म्हणून १८ वर्षे सेवा बजावली असून त्यांचे शिक्षण एमएबीएडपर्यंत झाले आहे. त्यांनी सुरुवातीला खालापूर तालुका नंतर कर्जत तालुका नंतर रोहा तालुक्यात आणि आता उप शिक्षिका म्हणून सेवा बजावल्यावर गेल्या काही वर्षापासून कर्जत तालुक्यातील माणिवली येथे सेवेत आहेत. तसेच, शैक्षणिक कार्यासह सामाजीक कार्यातही त्यांचा विशेष योगदान राहिले आहे.

## शेकाप चणेरा विभागाची आढावा बैठक



**। चणेरा । प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाचे रोहा तालुका चिटणीस शिवराम महाबळे यांच्या अध्यक्षतेखाली चणेरा विभागातील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक पार पडली. अगामी जिल्हा परीषद व पंचायत समिती निवडणुकी करीता बांधणी करणे व बुथनिहाय्य काम करण्यासाठी न्हावे येथील विकास भायतांडेल यांच्या निवासस्थानी ही बैठक संपन्न झाली. या बैठकीत विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी जिल्हा मजुर फेड्रेशनचे अध्यक्ष हेमंत ठाकूर, जिल्हा चिटणीस मंडळ सदस्य विनायक, वि.वि.ध. कार्यकारी सोसायटीचे अध्यक्ष गोपीनाथ गंभे, उपाध्यक्ष विकास भायतांडेल, धामणे, खांडेकर, तालुका पुरोगामी युवा संघटना अध्यक्ष संतोष दिवकर, खारगाव सरपंच एकनाथ मळेकर, महादेवखार सरपंच संकेत जोशी यांच्यासह राजेश्री शाबासकर, तानाजी म्हात्रे, निळकंठ कासकर, अविनाश पाटील, समीर खरिवले, मनोहर महाबले, समीधा यादव, गितेश भायतांडेल, संदिप भायतांडेल, गिरीश दांडेकर, सुनिल कोल्हाटकर, गणेश वाघीलकर व असंख्य कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

## रस्त्यांच्या दुरवस्थेविरोधात गांधीगिरी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महापालिकेने कामोठे परिसरात डांबरीकरणासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले आहेत. परंतु, ते रस्ते पहिल्याच पावसात उखडले गेले आहेत. डांबर वाहून गेल्याने रस्त्यावर वाळू व सिमेंटची खडी उरल्यामुळे सतत अपघातांच्या घटना घडत आहेत. या दुरवस्थेविरोधात पनवेल महानगरपालिकेला वारंवार निवेदने दिली तरीही पालिका प्रशासनाने केवळ आश्वासने देत वेळ मारून नेली आहे. असा आरोप नागरीकांकडून होत आहे. या पार्श्वभूमीवर एकता सामाजिक संस्थेने गांधीगिरीचा मार्ग स्वीकारत आंदोलन छेडले आहे. त्यांनी कामोठे पोलीस ठाण्यासमोरील चौकात प्रतिकात्मक स्वरूपात रस्त्यावरील वाळू, खडी आणि पाणी स्वतः साफ केले.



जनतेलाच झाडू हातात घ्यावा लागतोय, मग पालिका व लोकप्रतिनिधींचे काम कोण करणार? असा थेट सवाल देखील आंदोलकांकडून पालिका प्रशासनाला केला जात आहे.

आंदोलनादरम्यान, स्थानिकांनी सांगितले की, रस्त्यांवरील खडी व वाळूमुळे दुचाकी घसरून अनेक अपघात होत आहेत. हे टाळण्यासाठी आता आम्हालाच रस्ते स्वच्छ करावे लागत आहेत. जर अशीच परिस्थिती राहिली, तर मोठ्या प्रमाणावर लोकच रस्त्यावर उतरतील. या आंदोलनाचे नेतृत्व अमोल शितोळे यांनी केले. यावेळी माजी नगरसेवक प्रमोद भगत, शंकर म्हात्रे, मंगेश अढाव, बापू साळुंखे, देवानंद बाठे, अरुण जाधव, गौरव पोरवाल, संगीता पवार, उषा डुकरे, जयश्री झा, अनिल पवार, सुरज गोविलकर, डॉ. दशरथ माने, गणेश शिंदे, अल्पेश माने यांच्यासह अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## घाडी बंधूतर्फे शिक्षकांचा सन्मान



**। सोगाव । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील मुनवली येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी व घाडी बंधू यांच्यावतीने शुक्रवारी (दि.५) शिक्षक दिनानिमित्त येथील शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी व घाडी बंधू दरवर्षी आपल्या परिसरातील सर्व शिक्षकांचा सन्मान करत असतात. याहीवर्षी त्यांनी शिक्षकांचा सन्मान सोहळा शुक्रवारी आयोजित केला होता. त्यात सोगाव उर्दू अंगणवाडी सेविका रिजवाना मुल्ला, मदतनीस सुरय्या सय्यद, उर्दू हायस्कूल शिक्षिका तहसीन तडमुड, नेहा कांबळे-घोडपकर, अदिती हरवडे, कृतिका कदम, अक्षता कदम, इकरा कुर, फर्जाना कुर, अरबीना वाकनिस, अमरीन कुर, शिक्षक शैलेश तिर्लोटकर व अजित हरवडे आदींचा सन्मान करण्यात आला. यावेळी मान्यवरांसह उपस्थित शिक्षक अजित हरवडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. तसेच, हा सन्मान सोहळा दरवर्षी साजरा करण्यासाठी नेहमीच पुढाकार घेणारे सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी व घाडी बंधू यांचे विशेष कौतुक केले.

या सन्मान सोळळ्याला ज्येष्ठ समाजसेवक प्रकाश वडे यांच्यासह जिल्हा काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक उपाध्यक्ष लाईक कप्तान, दिलीप मोंढे, नंदकुमार म्हात्रे, अरविंद मसुरकर, सूर्यकांत भऊड, रुस्तुम कुर, सामाजिक कार्यकर्ते सतीश घाडी, सचिन घाडी, सानिका घाडी, संतोष बांद्रे, प्रविण घाडी, महेश नागावकर, संदेश करमेळे, रहूफ कुर, मुनावर कुर, निकेश अनमाने, नितेश ठकरूळ, मयूर अनमाने, प्रतीक अनमाने, सुयोग अनमाने, जयेश हाके, वेदिका मोंढे, म्हात्रे काकी यांच्यासह परिसरातील विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणेशभक्तांना 'शिव वडापाव'चे वाटप

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

शिवसेना (उद्धव ठाकरे) रायगड जिल्हा सहसंपर्क प्रमुख व राजिपचे माजी सदस्य किशोरभाई जैन मित्रमंडळाच्यावतीने दरवर्षी विसर्जनासाठी येणाऱ्या गणेश भक्तांसाठी 'शिव वडापाव'ची व्यवस्था करण्यात येते. कोरोनाची दोन वर्षे वगळता किशोरभाई जैन मित्रमंडळाने गेली ३१ वर्षे 'शिव वडापाव' वाटपाची परंपरा जोपासल्याचे दिसून आले.

या उपक्रमाचे नागोठणे पंचक्रोशीसह संपूर्ण जिल्ह्यात कौतुक होत आहे. नागोठण्यातील अंबा घाटावर शनिवारी संपन्न झालेल्या अनंत चतुर्दशीला किशोरभाई जैन मित्रमंडळाच्या वतीने 'शिव वडापाव' वाटपासाठी खास व शिस्तबद्ध व्यवस्था शिवसेनेच्या नागोठण्यातील पदाधिकाऱ्यांकडून करण्यात आली होती. वाटप करण्याच्या ठिकाणी खास मंडप उभारण्यात आले होते. यावेळी स्वतः किशोर जैन भाविकांना वडापावचे वाटप करण्याच्या कार्यक्रमात सहभागी झाले होते.




## कशेडी भुयारी मार्ग पूर्ण क्षमतेने सुरू | ४५ मिनिटांचा प्रवास अवघ्या ९ मिनिटांत

# चाकरमान्यांचा परतीचा प्रवास सुसाट

**। पोलादपूर । । प्रतिनिधी ।**

रायगड व रत्नागिरी जिल्हा जोडणारा महत्वाचा दुआ समजला जाणारा कशेडी भुयारी मार्ग दोन्ही बाजूने पूर्ण क्षमतेने वाहतुकीस सुरू आहे. त्यामुळे वीर ते भरणे नाका पर्यंतचा गणेशभक्तांचा प्रवास सुखकर होत आहे. कशेडीच्या दोन्ही भुयारी मार्गिकेमधून मुंबईसह कोकणात जाणाऱ्या हलक्या वाहनांसह अवजड वाहने देखील मार्गस्त होत आहेत. जुन्या मार्गावरील वळणावळणाचा त्रास कमी झाला असून त्यांचा प्रवास सुसाट व कमी वेळेत होत असून इंधन बचतीसह वेळही वाचत आहे. त्यामुळे गणेशोत्सवानिमित्त गावी आलेल्या चाकरमान्यांचा परतीचा प्रवास सुसाट झाला आहे.



कशेडी बोगदा हा चौपदरीकरणातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. रायगड व रत्नागिरी जिल्ह्याला जोडणारा हा पूर्वीचा कशेडी घाट हा जेवढा महत्त्वाचा आहे तेवढाच धोकादायक मानला जातो. तो पार करण्यासाठी वाहनांना ४० मिनिटांचा कालावधी लागत असे. या घाटातून प्रवास करताना वाहनांचे मोठ्या प्रमाणात अपघात होत असतात. तर, रसायनवाहू वाहने घाटात कलंडल्याने वाहतूक कोंडी झाल्याच्या घटना देखील घडल्या आहेत. याठिकाणी पर्यटकांबरोबरच गणेशोत्सव व शिमगोत्सवात मोठी वाहतूक कोंडी होत असते. मात्र, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने या बोगद्यासाठी सर्वेक्षण पूर्ण केल्यानंतर बोगद्याचे काम रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर्स कंपनीला देण्यात आले. या कामासाठी ५०२.२५ कोटी खर्च करण्यात आला असून पावणेदोन किलोमीटरचे एकदिशा मार्गाच्या वाहतुकीसाठी दोन बोगदे तयार करण्यात आले आहेत. दोन्ही बोगद्यांमध्ये प्रत्येकी ३ मार्गिका असून, बोगद्यांच्या आत ३०० मीटरवर छेद मार्ग असे एकूण ६ मार्गिका आहेत. दोन्ही बोगद्यांची उंची १२ मीटर असून, लांबी १६ मीटर आहे. मुंबई-गोवा महामार्ग भोगाव गावाच्या हद्दीत ७० मीटर अंतराचे दोन पूल मलेशिअन तंत्रज्ञान वापरून केले गेले आहेत. ६० मीटर अंतराचा तिसरा पूल २२० मीटर, चौथा पूल ६० मीटर आणि भोगाव बाजूच्या बोगद्याजवळ १०० मीटर अंतराचा पूल असे एकूण ६ पूल ५ किलोमीटर अंतरात आहेत.

रत्नागिरीचे तत्कालीन पालकमंत्री रवींद्र वायकर यांच्या हस्ते २०१९ मध्ये या कामाचा शुभारंभ खेड हद्दीत करण्यात आला होता. या भुयारी मार्गिकेमुळे प्रवासी वर्गाचा ४५ मिनिटांचा घाट प्रवास केवळ ९ मिनिटांत पूर्ण होत आहे.

# निवडक

## रोटरी क्लबतर्फे निवृत्त शिक्षकांचा सन्मान



**रोहा :** रोटरी क्लब ऑफ रोहा सेंट्रल आणि कोकण मराठी साहित्य परिषद शाखा रोहा यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.५) शिक्षक दिनाचे औचित्य साधून निवृत्त शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाच्या निमित्ताने माजी मुख्याध्यापक स.रा. मेहेंदळे यांच्यासह सुनंदा प्रधान, अलका शहा, श्रीनिवास साठे, अंजली साठे, अनंत जाधव, चंद्रकांत गावडे, धर्मा थळे, सरिता थळे, सरोज मेहतर, स्मीता शंकरराव म्हसकर, अजिता घोडींदे, लता सायगावकर, सदानंद तांडेल, प्रमोद चवरकर, अनिता घाणेकर, सुरेश मोरे, श्वेता रिसबूड, संजिवनी कडवेकर, बाळकृष्ण भादेकर, सुप्रिया क्षिरसागर, सुनीता मोरे, मनोहर चोपडे, ललीत गुजर इत्यादी निवृत्त शिक्षकांचा सन्मान करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब ऑफ रोहा सेंट्रलचे अध्यक्ष विजय दिवकर, राकेश कागडा, मयुर दिवेकर, दिलीप देशमुख, रुपेश पाटील, कोमसाप अध्यक्षा संध्या दिवकर, सुखद राणे, शरद कदम, नेहल प्रधान, भरत चौधरी, सुधीर क्षिरसागर यांच्या समवेत अनेक जण उपस्थित होते.

## उरणमध्ये मीनाताई ठाकरे यांना आदरांजली



**उरण:** कै. मीनाताई बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनी शनिवारी (दि.६) शिवसेना उरण शहर शाखेत व माँसाहेब मीनाताई ठाकरे वाचनालयात माजी आमदार मनोहर भोईर व नरेश रहाळकर यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. तसेच, उरण तालुक्यातील व शहरातील तमाम शिवसैनिकांनी उरण शहर शाखेत येऊन भावपूर्ण आदरांजली वाहिली. यावेळी माँसाहेब मीनाताई ठाकरे यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. यावेळी शहरप्रमुख विनोद म्हात्रे, शहर संपर्कप्रमुख गणेश म्हात्रे, माजी उपनगराध्यक्ष परमानंद करगुटकर, महिला आघाडीच्या उपजिल्हा संघटिका ममता पाटील यांच्यासह सुजाता गायकवाड, वंदना पवार, मेघा मेस्त्री, माधुरी चव्हाण, संगीता लोळगे, संजना कोष्टी, दीप्ती लोळगे, रेश्मा भोईर, निरंतर कदम, सूर्यकांत दरणे, पप्पू काठे, घनश्याम कडू, अजय म्हात्रे, सचिन पाटील, अनिल पाटील, संदेश पाटील, सुशांत तांडेल, संदीप पाटील, नंदू पाटील, संजय मेश्राम व सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

## घरगुती मखर आरास स्पर्धा उत्साहात



**कोलाड :** सकल हिंदू समाज कोलाड पंचक्रोशीच्यावतीने '२०२५ गणेशोत्सव मखर आरास देखावे स्पर्धा' आयोजित करण्यात आली होती. त्याचा बक्षीस वितरण सोहळा शुक्रवारी (दि.५) सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ वरसगाव आंबेवाडी नाका येथे पार पडला. या स्पर्धेतील विजेते प्रथम क्रमांक अविनाश गोरीवल, द्वितीय क्रमांक साईराज महाडिक आणि तृतीय क्रमांक भरत सातांबेकर यांना रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणारे प्रसाद साळवी यांना नुकताच जिल्हा परिषदेकडून पुरस्कार मिळाला आहे. त्यांचा देखील सत्कार करण्यात आला.
ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सकल हिंदू समाज कोलाड पंचक्रोशी यांनी मेहनत घेतली.

## अंजुमन इस्लम जंजिरा टेक्निकल इन्स्टिट्युटचा शंभर टक्के निकाल

**आगरदांडा :** अंजुमन इस्लाम जंजिरा हि कोकणातील प्रसिद्ध शैक्षणिक संस्था आहे. त्याच्या अंतर्गत प्राथमिक शाळा, माध्यमिक हायस्कूल, जुनिअर कॉलेज, महाविद्यालय आणि औद्यीगिक प्रशिक्षण संस्था चालवली जात आहेत. अंजुमन इस्लाम जंजिरा संस्थाच्या अंतर्गत चालणाऱ्या अंजुमन इस्लाम जंजिरा सिद्दी जफर शेखानी मेमोरिअल टेक्निकल इन्स्टिट्युट मुरुड येथील मागील ४७ वर्षांपासून कोकणाचे युवकांना तांत्रिक क्षेत्रात सक्षम बनविण्याचा काम यशस्वीरित्या करीत आहे. टेक्निकल इन्सटीट्युट मुरुडचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या वार्षिक परीक्षेचा निकाल जाहिर झाले आहे. संस्थेत चालणाऱ्या चार ट्रेडमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली असून प्रत्येक ट्रेड मधील निकाल हा शंभर टक्के लागला आहे. सलग तीन वर्षापासून या संस्थेचा शंभर टक्के निकाल राहिला आहे. शेहबाज मलबारी याला मेकॅनिकल मोटर गाडी या ट्रेंडमध्ये ९५.५० टक्के, सन्नी पाटील याला इलेकट्रीशनमध्ये ९२.५० टक्के, कलीम आदमने याला डिझेल मेकॅनिक मध्ये ९४.८३ टक्के, आय्यान असिफ खोत याला वेल्डरमध्ये ८४.३३ टक्के, प्रतिश पाटील याला मेकॅनिकल मोटर गाडी या ट्रेंड मध्ये ९१.८३ टक्के तर कविराज बलकावडे याने इलेकट्रीशन प्रथम वर्षात ९१.५० टक्के गुण मिळवले आहेत. या टेक्निकल इन्सटीट्युट मध्ये १३४ विद्यार्थी बसले होते व सर्व विद्यार्थी चांगले गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत.

# निवडक



## शेतकरी वर्गात प्रचंड नाराजी

**तळा** : प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना एकात्मिक पाणलोट घटक २.० तळा या अतंर्गत सोनसडे, कलमशेत, कर्नाळा फळशेत, अडनाळे,भानंग अशा जवळपास अकरा गावातील शेतकरी बांधवांसाठी फळबाग लागवड जुन २०२४ मध्ये दिली गेली. या लागवडीमध्ये काजु, आंबा लागवड करण्यात आली असून तब्बल १ वर्षे ३ महीने होऊनही शेतकरी बांधवांच्या खात्यात एक रुपया आला नसल्याने तळा तालुक्यातील शेतकरी बांधवामधून प्रचंड नाराजी व्यक्त केली जात आहे.शेतकरी बांधवांनी खड्डे खोदणे, लागवड करणे, खत देणे, त्याचबरोबर डिसेंबर २०२४ ते मे २०२५ पर्यंत पाणी व्यवस्थापन, कुंपन, आधार देणे अशी किती तरी कामे केली आहेत. मग शेतकरी बांधवांना अनुदान का दिले जात नाही असा प्रश्न लागवडधारक लाभार्थी करीत आहेत.संबंधित प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने तालुक्यातील शेतकरी बांधवांना अनुदान देण्याची व्यवस्था करावी अशी जोरदार मागणी शेतकरी बांधवांच्या वतीने केली जात आहे.



## विकास मिरगणे यांना झालेल्या मारहाणीचा तीव्र निषेध

**कर्जत** : कर्जत प्रेस क्लबचे सदस्य पत्रकार विकास मिरगणे गणपती विसर्जनाचे कव्हरेज करत असतांना त्यांना एपीआय शांताराम नाईक यांनी पार्किंगच्या कारणावरून मारहाण केली आहे. याप्रमाणे मुंबई प्रेस क्लब, मुंबई मराठी पत्रकार संघ, विधीमंडळ वार्ताहर संघ, टिव्हीजेए असोसिएशनच्यावतीने निषेध करण्यात आला असून. यासंबंधीत गृहमंत्री (शहर) योगेश कदम यांच्याकडे तक्रार सुद्धा केली आहे. गृहमंत्री कदम यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत डीसीपी यांना सांगून संबंधित प्रकरणाची चौकशी करून संबंधित एपीआय नाईक यांच्यावर कारवाईचे आदेश दिले आहे. या पोलीस अधिकाऱ्यावर त्वरित कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी रायगड प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत गोपाळे यांनी केली असून करीत आहे. याबाबत कर्जत प्रेस क्लब कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी व शासकीय कार्यालयांमध्ये भेट देऊन निवेदन सादर करणार आहे, अशी माहिती कर्जत तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष गणेश पवार यांनी दिली.



## महिलांनी केले अथर्वशीर्ष पठण

**रोहा** : वरदाई ट्रस्ट तर्फे महिलांनी एकत्र येऊन सभागृहामध्ये अतिशय भक्तिमय वातावरणात अथर्वशीर्ष पठण केले. महिलांचा उत्स्फूर्त सहभाग, सुंदर सादरीकरणामुळे संपूर्ण वातावरण मंगलमय झाले. या कार्यक्रमाला उपस्थित भाविकांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद देत महिलांच्या या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले. स्त्रियांच्या आवाजात झालेले अथर्वशीर्ष पठण हा खरोखरच अविस्मरणीय व समाधान देणारा अनुभव होता. या विशेष धार्मिक उपक्रमासाठी सहकार्य केल्याबद्दल वरदाई ट्रस्टचे सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्टच्यावतीने आभार मानले.

## नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

**माणगाव** : शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन बुधवारी (दि. १०) सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत जुने एसटी स्टँड माणगाव जवळ वृत्तपत्र विक्रेते नितीन मेथा यांच्या बाजूला असणाऱ्या महेंद्र मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये करण्यात आले आहे. सदर शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरीब गरजू लोकांनी घ्यावा असे आवाहन विजयशेठ मेथा यांनी केले आहे. शिबीर हे दरमहिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या बुधवारी होत असते. शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले आहे.


## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- अलिबाग, श्रीबाग येथे घरकाम व जेवणासाठी बाई पाहिजे आहे. पगार : रू.८,०००/- संपर्क : ९३७२४८०५५४
- मेडिकल एजन्सीमध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत शैक्षणिक पात्रता - १० वी व १० वीच्या पुढे मो नं. ९५०३३५५८८६/८६९८१३४६८९ तसेच मालाच्या डिलीव्हरी साठी ड्रायव्हर पाहिजे.
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, मोरी सहाय्यक (Helper) १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल : ७५५९१८४६१२
- Full Time /Part Time Teachers are to be appointed. Subjects: Science,Maths, English. Std: 8th,9th.Job location : Alibag. Attractive Salary. Apply:shikshaknokri@gmail.com
- दुकान गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग एसटी स्टँडजवळ ९७६४५४८६७९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


# गणेशोत्सवामुळे अर्थकारणाला तेजी

## अनेक घटकांना रोजगार व उत्पन्नाची संधी; बाजारपेठांमध्ये उत्साहाचे वातावरण

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

**गौरी गणपती उत्सव हा केवळ धार्मिक श्रद्धेपुरता मर्यादित न राहता ग्रामीण अर्थकारणाला नवी ऊर्जा देणारा उत्सव ठरतो. या काळात बाजारपेठांत उत्साहाचे वातावरण निर्माण होऊन शेतकरी, कारागीर, हस्तकला व्यावसायिक, फुलवाले, मिठाई विक्रेते, सजावटीची साधने बनवणारे अशा लहान मोठ्या व्यवसायिकासह अनेक घटकांना रोजगार व उत्पन्नाची संधी मिळते.**



सांस्कृतिक कार्यक्रम, भजन, कीर्तन यामुळे सामाजिक ऐक्य वृद्धिंगत होते. अशा प्रकारे धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक स्थैर्याची अनोखी सांगड घालणारा हा गणेशोत्सव खऱ्या अर्थाने ग्रामीण जीवनाचा कणा बळकट करतो. यामुळे धार्मिक बरोबरच सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक स्थैर्य उंचवणाऱ्या गौरी गणपती उत्सवामुळे ग्रामीण अर्थकारणाला तेजी आली आहे.

गणेशोत्सव हा कोकणवासीयांच्या जीवनातील केवळ धार्मिक सोहळा नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक उत्सव आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सवाच्या निमित्ताने माणगाव शहरातील बाजारपेठेला नवी झळाळी प्राप्त झाली आहे. कोकणातील बहुसंख्य कुटुंब नोकरी, व्यवसाय किंवा उद्योगधंद्यासाठी मुंबई, ठाणे, सुरत, पुणे तसेच इतर शहरांमध्ये स्थायिक झालेले असले तरी गणेशोत्सव, गौरी गणपती यांसारख्या सणांना ते आपल्या मूळ गावी परत आली आहेत.

या पारंपरिक ओढीमुळे माणगाव तालुक्यातील दुर्गम भागातील ही गावे अगदी गजबजून गेली आहेत. निजामपुर, विळे, इंदापूर, गोरेगाव, माणगाव येथील मंदावलेल्या बाजारपेठेत नवचैतन्य पसरले असून बाजारपेठेत लक्षणीय उलाढाल वाढली आहे.

माणगावातील बाजारपेठेत गेल्या कांही दिवसात झालेली उलाढाल या गोष्टीचे ठळक उदाहरण आहे. गणेशमूर्ती, सजावटीसाठी लागणारे साहित्य, फुलं, फळं, मिठाई, किराणा सामान यां सोबतच कपडे, भांडी, भेटवस्तू आणि इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या विक्रीतही मोठी वाढ झाली आहे. उत्सवाच्या काळात सर्व वयोगटातील लोक खरेदीसाठी बाजारात गर्दी करीत असल्याचे चित्र पाहायला मिळते.

व्यापाऱ्यांचे मंदावलेल्या व्यवहारांनी अचानक तेजी आली आहे. स्थानिक शेतकरी, फुलबागायतदार, व व्यवसायिक, किरकोळ व्यापारी, तसेच हंगामी स्टॉलधारकांना यामुळे चांगला फायदा झाला. तसेच गणेशोत्सवामुळे केवळ आर्थिक उलाढाल वाढली असे नाही, तर गावोगावी आनंद, एकोपा आणि नातेवाईकांमधील जवळीकही वाढली आहे. मुंबई, ठाणे, पुणे अशा शहरांमधून कोकणात परतणाऱ्या कुटुंबांनी घराघरांत उत्सवाची रंगत वाढवली आहे.

आप्तेष्टांच्या भेटीगाठी, एकत्र जेवणावळी, भजन, कीर्तन, आरत्या यामुळे गावात वेगळेच मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे. माणगाव शहर हे दक्षिण रायगडचा केंद्रबिंदू असल्याने येथील बाजारपेठ नैसर्गिकरीत्या आजूबाजूच्या गावांना आधार देते. त्यामुळे उत्सव काळात येथील आर्थिक उलाढालीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. स्थानिक व्यावसायिक, दुकानदार आणि हॉटेल व्यवसायिकांमध्ये उत्साह संचारला असून, वर्षभरातील मोठा महसूल या दिवसांत मिळतो.

## किनाऱ्याची केली स्वच्छता

**उरण** : कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अनंत चतुर्दशी व श्री गणेश विसर्जन झाल्यानंतर समुद्रकिनाऱ्यावर साचलेले निर्माल्य, केरकचरा, कॅरीबॅग, पाणी बॉटल्स तसेच गणपती विसर्जनासोबत टाकण्यात येणाऱ्या इतर वस्तू एकत्रित जमा करून सबंध समुद्रकिनाऱ्याची स्वच्छता करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जेसर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या स्वच्छता अभियानात विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षण व स्वच्छता संवर्धन याविषयी उपक्रम राबवून समाजात स्वच्छतेचा संदेश पोहोचवला. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता हिंगमिरे, प्रा. विनेता तांडेल तसेच इतर शिक्षक व विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## उल्हास नदी आश्रम ऐतिहासिक घाटावर स्वच्छता मोहीम



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत नगरपरिषद हद्दीतील दहीवली येथील शिवमल्हार गटातर्फे उल्हास नदी आश्रम या ऐतिहासिक घाटावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या स्वच्छता मोहिमेसाठी ओमकार कनोजे, लावण्या कनोजे, ईशांत मालुसरे, सार्थक गुरव, वेदांत सुपे, गौरव मूर्ती, यज्ञेश कनोजे, युगान सुर्वे, भव्य सुर्वे, तन्वी कनोजे, संकेत वरदाळे आणि नेत्रा कनोजे हे सभासद उपस्थित होते.

## नादुरुस्त ई-रिक्षांमुळे वाहतूक व्यवस्था कोलमडली

**। माथेरान । वार्ताहर ।**

गेल्या वर्षी २० ई-रिक्षाच्या सहा महिन्यांच्या पायलट प्रोजेक्टला सुरुवात झाली होती. टप्प्याटप्प्याने रिक्षाची संख्या वाढेल ही अपेक्षा होती मात्र सुप्रीम कोर्टात प्रत्येक तारखेला वेगवेगळे आक्षेप विरोधी पक्ष घेत होता. त्यामुळे अद्यापही वीसच गाड्या धावत आहेत माथेरानच्या खराब रस्त्यांचा फटका इ-रिक्षाला बसला आहे.



आठ रिक्षा नादुरुस्त असल्याने रिक्षासाठी तासनतास रांगेत उभे राहावे लागते तसेच रुग्णांना हॉस्पिटलमध्ये जाण्यासाठी देखील रिक्षा तात्काळ उपलब्ध होत नाहीत. रस्ते दुरुस्तीच्या कामात राजकीय दबावामुळे विलंब होत आहे की काय? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

> विद्यमान सनियंत्रण समितीची मुदत संपून दोन वर्ष झाली असल्याने नवीन समितीचे गठन करण्याची मागणी प्रवीण सकपाळ यांनी मंत्री आशिष शेलार यांच्याकडे केली आहे त्यानुसार शेलार यांनी पर्यावरण सचिव यांना नवीन सनियंत्रण समिती गठीत करण्याचे सांगितलं आहे या समितीमध्ये स्थानिकांचा समावेश असावा अशी देखील मागणी सकपाळ यांनी केली आहे.
> – सुनील शिंदे,
> सचिव रिक्षा संघटना

## बाप्पा चरणी भजनातून हरिनामाचा जागर

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

नवापाडा येथील प्रल्हाद घरत, दशरथ घरत, सुभाष घरत, संदीप घरत व अनुसया घरत यांच्या घरी दहा दिवसांच्या गणेशोत्सवानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या श्री सत्यनारायणाच्या महापूजेच्या निमित्ताने बेलपाडा येथील बहिरीनाथ भजन मंडळातर्फे भजनरुपी सेवा करण्यात आली.



गायिका सात्विका कडू, कल्पना कडू, निर्मला कडू, प्रीती कडू व गायक अशोक म्हात्रे यांनी आपल्या मनमोहक आवाजात बाप्पा चरणी भावगीते भक्तीगीते अर्पण करताना, त्यांच्या गायकीला उपस्थित भाविकांनी टाळ्यांच्या गजरात भरभरून दाद दिली. या कार्यक्रमाला अष्टगंध कलामंच नवी मुंबईचे नाट्य कलाकार धनेश्वर म्हात्रे, हसूराम पाटील, दत्तात्रेय म्हात्रे, जयकिसन मोकल, माणिक नाईक, जीवन डाकी, प्रसाद कडू, संदीप कोळी, जितेंद्र तांडेल, सत्यजित म्हात्रे, आकाश म्हात्रे, प्रज्योत घरत, विराज घरत, आयुष घरत, अंश घरत, तसेच अन्य नाट्य कलाकार उपस्थित होते. यावेळी भजन मंडळाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे यांना प्रल्हाद घरत यांच्या हस्ते सन्मान देऊन भजन मंडळाचा सत्कार करण्यात आला.

## आजी-माजी शिक्षकांचा सन्मान

**सोगाव** : जागतिक शिक्षक दिनानिमित्त मापगाव ग्रामपंचायत हद्दीतील आजी माजी शिक्षकांचा ग्रामविकास परिवर्तन आघाडी मापगावच्या सर्व कार्यकर्त्यांनी एकत्रितपणे त्यांच्या घरोघरी जाऊन शुभेच्छा देऊन सन्मानित केले. ग्रामविकास परिवर्तन आघाडी मापगाव तर्फे मापगाव ग्रामपंचायत हद्दीतील सात गावांमध्ये नेहमीच सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आरोग्य, क्रीडा आदी कौतुकास्पद उपक्रम राबविण्यात येत आहेत.

## स्पंदन निर्मित 'माझी माय मराठी' लोकनाट्य सादरीकरण

**। रोहा । प्रतिनिधी ।**

सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट रोहा यांच्या वतीने आयोजित उत्सवमंचावर स्पंदन संस्थेच्या वतीने माझी माय मराठी हे लोकनाट्य सादर करण्यात आले.



या लोकनाट्याचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे यात सहभागी झालेले सर्व कलाकार हे रोह्यातील स्थानिक तरुण होते. माझी माय मराठी या लोकनाट्यातूनही कलाकारांनी एक हृदयस्पर्शी सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला. मातृभाषेचे जतन, संस्कृतीचे संवर्धन आणि समाजातील एकात्मतेचे महत्त्व या नाट्यप्रयोगातून प्रभावीपणे अधोरेखित झाले.

## चिरनेर- खारपाडा रस्त्यावर रात्री टाकले जातेय डेब्रिज

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

पर्यावरणाला हानीकारक ठरणारे मुंबईतील डेब्रिज बेकायदेशीररीत्या चिरनेर साई खारपाडा मार्गावरील रस्त्यावर काही ठिकाणी जागोजागी टाकण्यात आले आहे. अवैधरित्या डेब्रिज टाकणाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी नागरिकांनी केली जात आहे.



या डेब्रिजमध्ये पर्यावरण व नागरिक, जैवविविधतेला घातक ठरणाऱ्या धोकादायक घटकांचाही समावेश असतो. शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या नजरा चुकवून रात्रीच्या वेळेत मोठ्या प्रमाणावर मुंबईतील डेब्रिज आणण्यात येते आहे. मुंबईतुन मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या या बेकायदेशीर डेब्रिजमुळे मात्र नवी मुंबई, पनवेल, उरणमधील काही ठिकाणी डेब्रिजचे डोंगरच निर्माण झाले आहेत. यामुळे मात्र पर्यावरण व नागरिक, जैवविविधतेचीही हानी होत आहे.

## उपसरपंचपदी सुरेखा दळवी

**पाताळगंगा** : सत्तेसाठी काय पण? म्हणत असलेले होराळे ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी मनाचा मोठेपणा दाखवून एक नवा आदर्श निर्माण करण्याच्या केलेल्या प्रयत्नाला खऱ्या अर्थाने यश मिळाले. लहानपणापासूनच समाजसेवेचे वेड असलेल्या सुरेखा दळवी यांनी राजकारणात उतरण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या निर्णयाला जनतेनेही उत्तम प्रतिसाद दिला. ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आलेल्या सुरेखा दळवी यांची होराळे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली.

## मुस्लिम समाज कर्जततर्फे रक्तदान

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

ईद - ए - मिलादच्या दिवशी मुस्लिम समाज कर्जत तर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ३० रक्तदात्यांनी रक्तदान करून ईद -ए-मिलाद उत्सव साजरा केला.



कर्जत - खालापुर तालुक्यातील ५२३ वे रक्तदान शिबीर मुस्लिम मस्जिद कर्जत येथे आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी एकूण ३० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक, मानवतावादी व राष्ट्रीय कार्य करून थेलेसेमिया नावाच्या आजाराच्या लहान बालकांना दर १५ दिवसांनी रक्त द्यावे लागते. त्यांना जीवनदान देण्याचे काम केले.

या रक्तदान शिबिरात प्रथम रक्तदान नवाज तांबोळी यांनी करून रक्तदान शिबिराची सरूवात केली. मुस्लिम समाज कर्जतचे अध्यक्ष सैदु शेख, उपाध्यक्ष अब्बास शेख, शाहनवाज हुसेन मुल्ला, नसार शेख, अमिर मणियार, सलीम जळगावकर, हैदर शेख, अब्दुल रहमान मुल्ला, रमजान शेख, मोजम पानसरे, जरूर शेख, जमीर शेख, खालील जळगावकर, रहीम मुल्ला, सलीम अन्सारी, कलीम मुल्ला, खुदबुद्दीन शेख, नवाज तांबोळी बिलाल आढाळ, शादाब शेख, जावेद शेख, शेरवान पठाण आदी उपस्थित होते. रक्तसंकलनाचे काम घाटकोपर येथील समर्पण रक्तकेंद्राचे डॉ. रमेश सिंग, लता देशक, योगेश इतर कर्मचाऱ्यांनी केले.

## बाजारात मासळीची आवक वाढली | कोळी बांधवांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

# रायगडात खवय्यांचा मासळीवर ताव

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

**पाच व दहा दिवसांच्या गणरायाचे विसर्जन झाले आणि काही दिवसांपूर्वी श्रावण देखील संपला आहे. त्यामुळे आता खवय्यांच्या उड्या मासळीवर पडत आहे. तसेच समुद्रात मासेमारीसाठी होड्यादेखील जात आहेत. परिणामी जिल्ह्यात सध्या समुद्रातील मासेमारी जोरात सुरू आहे. त्यामुळे मासळीची आवक वाढली आहे.**



मासे मुबलक सापडत असल्यामुळे मासळीचे भाव सुद्धा आटोक्यात आहेत. त्यामुळे स्थानिकांसह येथे येणारे पर्यटक व खवय्यांची चंगळ झाली असून ते मासळीवर ताव मारताना दिसत आहेत.

जून महिन्यापासून मासेमारी बंद होती. नारळी पौर्णिमेनंतर दर्याला नारळ अर्पण करून बोटी समुद्रात गेल्या. मात्र पुन्हा वादळी वाऱ्यामुळे बोटी किनाऱ्यावर परतल्या. मात्र सध्या वातावरण अनुकूल असल्यामुळे आता पुन्हा मासेमारी सुरू झाली आहे. त्यमुळे मोठ्या विश्रांती नंतर मासळीची चांगली आवक सुरू झाली आहे. जिल्ह्याला २४० किमी लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. त्यामुळे येथे ताजी मासळी सहज उपलब्ध होते. पर्यटक खास ताजी मासळी खाण्यासाठी येथे येतात. तर येथील मासळी मोठ्या प्रमाणात मुंबई व इतर शहरात देखील जाते. कोळंबी, सुरमई, रावस, टोळ, कर्ली, घोळ व पापलेट आदी माशांना पसंती मिळत आहे. बागडा, बोंबील, मांदेली, बांगडा असा माशांची सध्या लॉटरी लागत आहे.

### मासळी दर प्रतिकिलो (ठिकाणानुसार यामध्ये कमी जास्त भाव आहे)

बोंबील – २०० ते ३०० रुपये किलो
पापलेट मध्यम – आता ६०० ते ७०० रुपये किलो
पापलेट मोठे – आता १००० ते १२०० रुपये किलो
सुरमई, रावस – ७०० ते ८०० रुपये किलो
मांदेली – १५० रुपये किलो
लाल छोटी कोलंबी – ४०० रुपये किलो
बांगडा मालवणी – ३०० रुपये किलो
हलवा – ६०० रुपये किलो किंवा ५०० रुपयाला २ मध्यम आकाराचे हलवे
टोळ – ४०० रुपये किलो
याबरोबरच इतरही विविध प्रकारची मासळी विक्रीसाठी येत आहे.

> श्रावण नुकताच संपला आहे. तसेच गणरायाचे विसर्जन देखील झाले आहे. त्यामुळे मागील महिनाभरापासून शाकाहारावर असलेले नागरिक आता मांसाहार करू लागले आहेत. मांसाहारामध्ये मासळीला विशेष पसंती आहे. तसेच गणपतीसाठी अनेक चाकरमानी गावी आले आहेत. त्यांचा कल मासळी खाण्यावर अधिक आहे. मासळी देखील मुबलक, ताजी व स्वस्त भेटत आहे. खवय्ये खुश आहेत. विक्री सुद्धा चांगली होत आहे.
> – गौरी मनोरे,
> मासळी विक्रेत्या, पेण–पाली

## निवडक

(छायाचित्र : राकेश खराडे)



### तुपगावात ईद ए मिलाद उत्साहात

**रसायनी :** तुपगाव-चौक येथे ईद ए मिलाद ऊन नबीनिमित्ताने उत्साहाच्या आणि आनंदी वातावरण निर्माण झाले आहे. इस्लामिक कॅलेंडरनुसार रबी-उल-अव्वलच्या १२ व्या तारखेला साजरा होणाऱ्या ईद-ए-मिलाद-उन-नबीनिमित्त तुपगाव येथे उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. पैगंबर मोहम्मद साहेबांच्या जयंतीनिमित्त मुस्लिम बांधवांनी तुपगाव येथे रॅली काढली, ज्यामध्ये मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव, महिला व मुले सहभागी झाले होते. ही रॅली जामा मशीद येथून सुरू होऊन संपूर्ण तुपगाव मोहल्ला फिरून पुन्हा जामा मशीद येथे आल्यावर खीर वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला. या रॅलीमध्ये लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वच वयोगटांतील मुस्लिम बांधवांचा सहभाग होता. शिस्तबद्ध पद्धतीने आणि शांत मार्गाने ही रॅली पार पडली. यावेळी संपूर्ण रॅली मार्गावर शांतता आणि एकोपा कायम ठेवण्यात आला, ज्यामुळे या धार्मिक उत्सवाचा आनंद द्विगुणीत झाला. यावेळी हिंदू बांधवांनीदेखील शुभेच्छा दिल्या. चौक प्रभारी विशाल पवार व त्यांचे सहकारी उपस्थित होते.



### पालीत ईदनिमित्त शांतता, श्रद्धेचा संदेश

**सुधागड-पाली :** सुधागड तालुक्यातील पाली येथे ईद मिलादुन्नबीचा पवित्र सण अत्यंत उत्साहात आणि शांततेच्या वातावरणात साजरा करण्यात आला. पैगंबर हजरत मोहम्मद सल्लल्लाहु अलैही वसल्लम यांच्या जन्मदिनी मुस्लिम समाजाने एकत्र येत श्रद्धा, प्रेम आणि एकतेचा संदेश दिला.पालीतील खालच्या मोहोल्यातून दुपारी तीन वाजता मिरवणुकीची सुरुवात झाली. गजरात, सहभागी बांधव मशिदीकडे शांततेने आणि अनुशासनात मार्गक्रमण करत होते. मिरवणुकीत लहान मुलांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला. हरे झेंड्यांनी सजवलेली गल्ली, नात पठण करणारे तरुण आणि दुवांच्या स्वरांनी भरलेले वातावरण हे सणाचे पवित्रत्व अधोरेखित करत होते. पाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. मिरवणुकीचा मार्ग, वाहतूक नियंत्रण, आणि सुरक्षेची व्यवस्था उत्तम प्रकारे हाताळण्यात आली. पोलीस प्रशासन आणि स्थानिक नागरिक यांच्यातील समन्वयामुळे संपूर्ण कार्यक्रम निर्विघ्न पार पडला.

### कीर्ती धारणेंना आदर्श शिक्षक पुरस्कार



**रसायनी :** कीर्ती किरण धारणे उपशिक्षिका सांगडे, ता. खालापूर, जि. रायगड यांना रायगड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शिक्षकदिनी हा पुरस्कार रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाने जाहीर केला. त्यांच्या या विशेष शैक्षणिक योगदानाची दखल रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाने घेतली. त्यामुळे त्यांना रायगड जिल्हा परिषदेचा सन २०२५-२६ या वर्षाचा जिल्हा परिषद आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळावा आहे. त्यांचे शाळा व्यवस्थापन समिती शाळा सांगडे, सांगडे ग्रामस्थ आणि महिला मंडळ, पालक वर्ग, ठाणेन्हावे ग्रामस्थ, पंचायत समिती शिक्षण विभाग खालापूर, खालापूर तालुका सर्व शिक्षक संघटना यांनी अभिनंदन केले आहे.

### 'खा. तटकरेंमुळे गावठाण प्रकल्प पूर्ण'

**बोर्लीपंचतन :** गेल्या २० वर्षांपासून प्रलंबित असलेला दिवेआगरचा गावठाण प्रकल्प मार्गी लागण्यासाठी माजी सरपंच उदय बापट व त्या वेळेचे ग्रामपंचायत सदस्यांनीदेखील प्रयत्न केले होते. तो गावठाण प्रकल्प पूर्ण होण्यासाठी दिवेआगरचे विद्यमान सरपंच सिद्धेश कोसबे आणि ग्रामपंचायत सदस्यांनी सातत्याने पाठपुरावा चालूच ठेवला होता.

याकामी शासकीय कामातील सर्व गोष्टीची पाहणी करुन ग्रामस्थांचे गावठाण प्रकल्पातील मार्ग सुखकर करणारे श्रीवर्धन प्रांत अधिकारी महेश पाटील, तहसीलदार महेंद्र वाकलेकर, बोर्लीपंचतन मंडल अधिकारी सुनील पाटील यांचेदेखील योगदान मोलाचे ठरले.

दिवेआगरचे गावठाण प्रकल्पात खा. सुनील तटकरे, मंत्री आदिती तटकरे आणि अनिकेत तटकरे यांनी लक्ष घातल्यामुळेच हा प्रकल्प मार्गी लागला असल्याचे सरपंच सिद्धेश कोजबे आणि ग्रामसेविका माया पालवे यांनी सांगितले. गावठाण प्रकल्पातील जागा ग्रामस्थांना मोजणी करुन देऊन हद्द कायम करुन देण्यात आली. यावेळी ते बोलत होते. यावेळी ग्राम महसूल अधिकारी रोहित मोरे, ग्रामपंचात सदस्य राकेश केळसकर, मोहिता कोसबे, नेहा पाटील, श्रीकांत विरकुड, कर्मचारी आणि त्या विभागातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# बाप्पा जाताच गावे ओस

## • घरादारांना लागली कुलुपे



**| तळा | प्रतिनिधी |**

गेले पंधरा दिवस घराघरात जणू चैतन्यच निर्माण झाले होते. गणेशोत्सवानिमित्त अवघ्या तळा तालुक्यातील खेडी माणसांनी फुलून गेली होती. बंद दरवाजे सताड उघडे राहात होते. माणसांची वर्दळ या घरातून त्या घरात सुरु राहिली होती. गोडाधोडाच्या पदार्थांचा मधुर सुवास अवघ्या गल्लीत पसरत होता. विसर्जनानंतर करण्यात आलेल्या चमचमीत मटण रस्स्याचा सुवासही असाच भूक चाळविणारा ठरत होता. हजारो चाकरमान्यांमुळे बंद असणारी घरेही बोलकी वाटत होती. पण, विसर्जन होताच हीच बोलकी घरे अबोल झाली आणि पुन्हा एकदा या घरांना टाळे लागले.

अशी स्थिती तळा तालुक्यातील प्रत्येक गावागावात झाली आहे. तळा तालुक्यात सण-उत्सवात ग्रामीण भाग ते शहरात गणेशोत्सव व होळी उत्सवासाठी चाकरमानी मोठ्या प्रमाणात गावाकडे येत असतात. त्यातच गणेशोत्सव हा सर्वांत मोठा सण व उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. या गणेशोत्सवात गावागावात चाकरमानी मंडळी आपल्या कुटुंबासह गावात आली होती. सारा गाव माणसांनी फुलून गेला होता. सर्व घरे प्रकाशमय झाली होती. सर्वांच्या आनंदाला भरते आल्याचे एक आगळेवेगळे आनंदीमय चित्र पाहावयास मिळत होते. सर्व घरे जणू काही आनंदाने बोलकी झाली होती.

शेजारीपाजारी मोठ्या आनंदाने एकमेकांकडे जाऊन आनंदाने विचार व्यक्त करताना दिसत होती. साऱ्या गावात कोठे ढोलकीचा आवाज, तर कोठे भजनाचा आवाज, तर कोठे बाल्या नाच, तर कोठे सत्कार समारंभ, तर कोठे गावविकासाठी सभा, तर कोठे गावचा विकास आराखडा नियोजन, असे विविध कार्यक्रमांचे आयोजन होत होते. साऱ्या गावात माणसांची रेलचेल होती. मात्र, आता गणेशोत्सव संपला आणि चाकरमानी मंडळी पुन्हा आपल्या कामावर रूजू होण्यासाठी मुंबई पुणेकडे परतीच्या प्रवासाला लागून गावे रिकामी झाली. फुललेल्या गावात आता शुकशुकाट पाहावयास मिळत आहे. आता राहिली ती फक्त वयोवृद्ध माणसे व अनेक बंद घरे. आता गावातील येणारा आवाज, सर्व काही शांत झाला आहे. हीच माणसे येथे राहिली तर, परंतु येथे राहण्याच्या दृष्टीने एखादा उद्योगधंदा, व्यवसाय असायला पाहिजे, हाताला काम मिळायला पाहिजे, तरच राहता येईल, या साऱ्याचा विचार करता तळा तालुक्यात कोणतातरी उद्योगधंदा अथवा कारखाना होणे आवश्यक आहे. उद्योगधंदे येथे निर्माण झाले, तर येथील चाकरमानी गावाकडे राहतील व हरवलेले गावपण पुन्हा गावाला मिळून गणेशोत्सवासारखीच गावे नियमित आनंदात राहातील. प्रकाशमय फुललेली दिसतील, असा विचार वयोवृध्द नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.



## अनिल पुलेकरांची टिटवाळा आश्रमास सदिच्छा भेट

**| कोर्लई | प्रतिनिधी |**

मुरुडमधील सामाजिक कार्यकर्ते अनिल पुलेकर यांनी शाम जंगम, प्रफुल्ल नल्ला, दीपक कोळेकर यांच्यासमवेत टिटवाळा येथील जीवन संवर्धन फाऊंडेशन मुलांच्या आश्रमास सदिच्छा भेट देऊन मुलांना थोर पुरुषांची पुस्तके देऊन आनंद द्विगुणित केला.

यावेळी सर्व प्रथम गणरायाला नमन करून सर्वांनी भक्तीगीते सादर केली. सर्व मुलं उत्साहाने गाण्यांना चागंली दाद देत होती. यातील एका मुलाने हिंदी गाणं म्हटलं. मुलांचा नाचण्याचा अतिउत्साह पाहून शामने मै हूं डॉन हे गाणं पेश केलं. मुलांनी या गाण्याला नाचून आनंद व्यक्त केला. अनाथ मुलांच्या शिक्षणासाठी जीवन संवर्धन फाऊंडेशन करीत कसलेले अनमोल सामाजिक कार्य पाहून अक्षरशः भारावून गेले, आर्थिक मदतीचा हात पुढे करुन कौतुक केले.

## पान विक्रेते संतोष वर्मांचा प्रामाणिकपणा

**| सुकेळी | प्रतिनिधी |**



मुंबई-गोवा महामार्गावरील वाकण नाक्यावरच अनेक वर्षांपासून पान विक्रीचा व्यवसाय करणारे संतोष वर्मा यांनी आपल्या दुकानात पाकीट विसरुन गेलेल्या ग्राहकाला ते परत करुन एक माणुसकीचे दर्शन घडविले आहे. याबाबतीत संतोष वर्मा यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, महामार्गावरुन दापोली (रत्नागिरी) बाजूकडे प्रवास करणारे उल्हास मदन साळगावकर हे आपल्या ताब्यातील गाडी क्र. एम.एच. ०८ ए.एन. ०६५३ हे वाकण नाक्यावर आले असताना ते वाकण नाक्यावरती एका पान टपरीवरती काही खरेदीसाठी थांबले. खरेदी केल्यानंतर घाईगडबडीत ते आपले पाकीट त्या पानटपरीवरती विसरुन गेले. जवळपास खांब नाक्याच्या पुढे गेल्यानंतर उल्हास यांच्या लक्षात आल्यानंतर ते पुन्हा वाकण या ठिकाणी पान टपरीवरती जाऊन विचारणा केली असता संतोष वर्मा यांनी ते पाकिट परत केले. त्यामध्ये जवळपास पाच ते सहा हजार रु. रोख रक्कम, लायसन्स, अजूनही कही कागदपत्रे उपलब्ध होती. परंतु, संतोष वर्मा यांनी या सर्व वस्तू रितसर उल्हास यांना परत केल्यामुळे अद्यापही माणुसकी जिवंत असल्याची जाणीव करून दिली आहे. संतोष यांच्या प्रामाणिकपणाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

## वृषाली गुरव यांना आदर्श पुरस्कार

**| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |**



रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांतील रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार नुकतेच जाहीर झाले. सुधागड तालुक्यातील प्राथमिक विभागातून नवघर शाळेच्या वृषाली प्रशांत गुरव या शिक्षिकेची निवड रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी करण्यात आली.

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## ऑनलाइन फसवणूक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

बेटिंगचे आमिष दाखवून खारघरमधील एका बांधकाम व्यावसायिकाची तब्बल १ कोटी २३ लाख ८५ हजार रुपयांची ऑनलाइन फसवणूक झाल्याची घटना घडली आहे. याबाबत नवी मुंबईच्या सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

बांधकाम व्यावसायिक हे खारघर येथील सेक्टर १२ मधील तुलसी सोसायटीत राहतात. ऑगस्ट या महिन्याभराच्या कालावधीत एका महिलेने पीडित बांधकाम व्यावसायिकांना संपर्क साधून त्यांना बेटिंगसाठी तयार केले. बांधकाम व्यावसायिकाचा विश्वास संपादन केल्यावर त्यांना संकेतस्थळाची एक लिंक पाठविण्यात आली. बेटिंगमधून मोठी रक्कम मिळणार असल्याने त्यांनी माहिती दिल्यानंतर ही फसवणूक झाली.

## सरकारी दबावाने विनाशकारी प्रकल्प रेटण्याचा प्रयत्न

### • ॲड. ऋषिकेश जोशी यांचा आरोप

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात टोरंट जलविद्युत प्रकल्प कर्जत तालुक्यात येऊ घातला आहे. या प्रकल्पाला स्थानिक शेतकऱ्यांनी अद्याप जमिनी दिलेल्या नाहीत. मात्र, पर्यावरणविषयक जनसुनावणीमध्ये स्थानिक शेतकऱ्यांनी जोरदार आक्षेप नोंदवला. दरम्यान, अशा विनाशकारी प्रकल्पांच्या माध्यमातून कर्जत तालुक्यातील वनराई संपुष्टात आणण्याचा डाव आहे, असा आरोप भाजप युवा मोर्चा प्रदेश सरचिटणीस ॲड. ऋषिकेश जोशी यांनी केला आहे. त्या प्रकल्पाला विरोध करण्यासाठी आणि वन वाचवण्यासाठी लोकजागरण वने आणि पर्यावरण रक्षण समिती स्थापन करण्यात आली आहे.

टोरंट या खासगी कंपनीचा विनाशकारी पॉवर प्रोजेक्ट कर्जतमध्ये येत आहे. या प्रकल्पासाठी २३३ हेक्टर वन जमीन जाणार असून,



त्या जमिनीमध्ये सध्या लाखो झाडे आहेत.

या वनस्पतीबाबत कंपनीने नेमलेल्या एनजीओ कंपनीने शासनातील अधिकारी वर्गास हातास धरून प्रदूषण नियंत्रण बोर्डने आयोजित केलेल्या सुनावणीमध्ये नागरिकांची फसवणूक केल्याचे समोर आलेले आहे. या प्रकल्पास वन खात्याने मान्यता दिलेली नाही. असे असतानादेखील प्रशासनाने जनसुनावणी घेतली आणि शेतजमीन प्रकल्पात जाणाऱ्या शेतकऱ्यांना निमंत्रण दिले नाही. या प्रकल्पामुळे ज्या भागात बिबट्याचे वास्तव्य आढळून येते, त्या भागातील वन संपदा नष्ट होणार आहे. वने नष्ट झाली तर मोकळा श्वास कुठून घ्यायचा, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

**जाहीर नोटीस**

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक १) फैयाज युसुफ बुबेरे, २) रहेमत अली रियासत अली शेख यांचेकडून खालील मिळकत विकसनासाठी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. ममदापुर, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १५१ | १६ | ५२३-०० | ५२-३० |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल विकसनाचा करारनामा पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. ०८/०९/२०२५

**ॲड. सुमित दत्तात्रेय कराळे**
पत्ता - ममदापुर नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो. - ९१६८९७८४३८.

**जाहीर सुचना**

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री दिनेश गुरुनाथ कडव रा. वडवली याच्याकडून कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे चांदई, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ८१/३ एकुण क्षेत्र ०.२६.०० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलाच्या लाभात सोडून दिलेला असून त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक ०८/०९/२०२५

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

**सरखेल कान्होजी आंग्रे नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, किहीम**
कार्यालय मु. पो. चोंढी, ता. अलिबाग, जि. रायगड.
रजि. नं. आरजीडी/ओबीजी/आरएसआर (सी आर)/३११/२७/४/१९९३

**३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांसाठी)**

स.न.वि.वि. दिनांक : ०५/०९/२०२५

सरखेल कान्होजी आंग्रे नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, किहीम या संस्थेच्या सभासदांची ३२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २० सप्टेंबर २०२५ रोजी श्री जय भवानी क्रीडा मंडळ, कामथ हॉलमध्ये दुपारी ठिक ३:३० वाजता सभेच्या कार्यक्रमपत्रिकेवरील कामकाजासंबंधी विचार करण्यासाठी होणार आहे. तरी आपण सभेस अवश्य उपस्थित राहून सभेच्या कामास सहकार्य करावे, ही विनंती.

**सभेची कार्यक्रम पत्रिका-**

१) संस्थेची दिनांक ३१ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) संस्थेच्या दिनांक ३१/०३/२०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल वाचून मंजूर करणे.
३) दिनांक ३१/०३/२०२५ रोजीचा वार्षिक ताळेबंद, नफा-तोटा पत्रकास मान्यता देणे.
४) दिनांक ३१/०३/२०२५ अखेरच्या शासकीय हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.
५) व्यवस्थापन समितीने शिफारस केलेल्या दिनांक ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या नफा वाटणी प्रस्तावास व लाभांश वाटपास मंजूरी देणे.
६) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षणासाठी शासन नामतालिकेवरील लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्याचे मानधन ठरविणे.
७) सन २०२५-२०२६ अंदाजपत्रकाबाबत विचार करणे.
८) संचालक मंडळ व त्याचे कुटुंबियांना दिलेली कर्जे व वसूली पत्रकाची नोंद करणे.
९) संस्थेस सुधारीत आदर्श उपविधी स्विकारणे बाबत..
१०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी आयत्यावेळी विषयांवर विचार करणे.

स्थळ: चोंढी
दिनांक : ०५/०९/२०२५

आपले विश्वासू,
**श्री. मोहन पांडुरंग खोत**
सेक्रेटरी

**विशेष सूचना :** १) गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास हिच सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल.
२) संस्थेच्या आर्थिक हिशोब अगर काही बाबतीत माहिती अथवा स्पष्टीकरण हवे असल्यास दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी संस्थेच्या कार्यालयात लेखी विचारणा करावी. सदर मुदतीनंतर आलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली जाणार नाहीत.
३) ज्या सभासदांना काही प्रस्ताव अथवा सूचना पाठवावयाच्या असतील त्यांनी आपले प्रस्ताव अथवा सूचना दिनांक १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत संस्थेच्या कार्यालयीन वेळेत पोहोचवावेत व सभेस स्वतः उपस्थित रहावे.

**प्रशिक्षण कार्यक्रम :** सभेपूर्वी दुपारी ३:०० वा. सन २०२५-२०२६ या वर्षाचे सभासद प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या., पुणे यांच्या सहकार प्रशिक्षण केंद्र पुणे यांच्याकडून घेण्यात येईल.

**सूचना :** ज्या सभासदांचा पत्ता (राहण्याचे ठिकाण) बदललेला आहे त्यांनी त्याची माहिती संस्थेला कळविणे.

**जाहीर नोटीस**

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती मिळकत तिचे मालक समीर नूर मोहम्मद शेख यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. कोल्हारे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नंबर | प्लॉट नं. | क्षेत्र (चौ.मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ७६ | ५ | २९१-०० | २९-१० |

तरी वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजामुक्त आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे

दि. ०८/०९/२०२५.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता - शॉप न. १२, शिवगंगा अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो. - ९३२५०६००३७.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत तिचे मालक सौ. सुमन तानाजी करताडे, रा. सावरगांव, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे सावरगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| १३ | ० | १.६२.९० | ८.५५ |

पैकी सौ. सुमन करताडे यांचे असलेल्या हिश्यापैकी विक्री केलेले क्षेत्र २२ गुंठे

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल मागाहून येणाऱ्या तकारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. ८/९/२०२५

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस.एस.एल.बी.
प्रभात अपार्टमेंट, रूम नं. ४,
दुसरा मजला, सुनिल चिक्कीजवळ,
ता. कर्जत, जि. रायगड
मो. नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे बोरगाव, ता. कर्जत, जि. रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै |
|---|---|---|
| ११२/१६/अ | एकूण क्षेत्र ०-३०-०० हे. आर. | ०.२२ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ (तीन) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०८/०९/२०२५

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं ९०२८८१७९३०
पत्ता- शॉप नं. २३, प्लॉट नं. ५१, कल्पतरू कॉम्प्लेक्स,
सेक्टर ०९ खांदा कॉलनी, पनवेल, ता. पनवेल, जि.रायगड ४१०२०६

# बीसीसीआयने मोडले कमाईचे रेकॉर्ड

## || बीसीसीआयचा बँक बॅलन्स २०,६८६ कोटींवर || ५ वर्षात १४,६२७ कोटी रुपये कमावले; २०१९ मध्ये तिजोरीत ६,०५९ कोटी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचा एकूण बँक बॅलन्स २०,६८६ कोटींवर पोहोचला आहे. गेल्या ५ वर्षात बोर्डाने १४,६२७ कोटी कमावले आहेत. गेल्या आर्थिक वर्षात (२०२३-२४) ४,१९३ कोटी कमावले होते. २०१९ मध्ये, बीसीसीआयच्या तिजोरीत ६,०५९ कोटी होते. राज्य क्रिकेट संघटनांसोबत शेअर केलेल्या आर्थिक अहवालात ही माहिती समोर आली आहे. बीसीसीआयची वार्षिक सर्वसाधारण सभा २८ सप्टेंबर रोजी होणार आहे, जिथे नवीन आर्थिक तपशील शेअर केले जाणार आहेत.




अहवालानुसार, २०१९ मध्ये बीसीसीआयचा सर्वसाधारण निधी ३,९०६ कोटी होता, जो २०२४ मध्ये वाढून ७,९८८ कोटी झाला. म्हणजेच, पाच वर्षांत त्यात ४,०८२ कोटींची वाढ झाली आहे.

बीसीसीआयने कर देयतेबाबतही मोठ्या तरतुदी केल्या आहेत. बोर्डाने २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी आयकरासाठी ३,१५० कोटी रुपये राखीव ठेवले आहेत. जरी हे प्रकरण न्यायालये आणि न्यायाधिकरणांमध्ये प्रलंबित असले तरी, कोणत्याही संभाव्य देयकाचा विचार करून ही रक्कम राखीव ठेवण्यात आली आहे. २०२३-२४ मध्ये आंतरराष्ट्रीय पुरुष क्रिकेट स्पर्धांमधून मिळणारे उत्पन्न ३६१.२२ कोटी होते, जे गेल्या वर्षीच्या ६४२.७८ कोटींवरून कमी झाले. याशिवाय, मीडिया हक्कांमधून मिळणारे उत्पन्न देखील २,५२४.८० कोटींवरून कमी होऊन ८१३.१४ कोटींवर आले.

कमी आंतरराष्ट्रीय सामने आणि आयसीसी क्रिकेट विश्वचषक २०२३ च्या आयोजनामुळेही घट झाली. आयपीएलमधून मिळणारे उत्पन्न आणि आयसीसीकडून मिळालेल्या वाट्यामुळे, बीसीसीआयला २०२३-२४ मध्ये १,६२३.०८ कोटींचा अतिरिक्त नफा मिळाला आहे. हा गेल्या वर्षीच्या १,१६७.९९ कोटींपेक्षा खूपच जास्त आहे.

मीडिया आणि ब्रॉडकास्टिंग हक्क म्हणजे आयपीएलच्या सामन्यांचे थेट प्रक्षेपण करण्याचा अधिकार. सामन्याच्या थेट प्रक्षेपणाव्यतिरिक्त, ज्या कंपनीकडे मीडिया हक्क आहेत तीच कंपनी हायलाइट्स दाखवू शकते. बीसीसीआयला यातून सर्वाधिक महसूल मिळतो. २००८ मध्ये, टायटल स्पॉन्सरशिपसाठी दरवर्षी ५० कोटी रुपये देण्यात आले होते. तर २०२३ मध्ये हा आकडा दरवर्षी ३०० कोटी रुपयांपेक्षा जास्त झाला. टाटा आणि बीसीसीआयमध्ये दोन वर्षांचा करार झाला होता, ज्यासाठी एकूण ६०० कोटी रुपये देण्यात आले होते.

जेव्हा कोणताही नवीन संघ आयपीएलचा भाग बनतो तेव्हा त्यासाठी फ्रँचायझी फी भरावी लागते. ही संपूर्ण प्रक्रिया बोलीद्वारे केली जाते, ज्यामध्ये वेगवेगळ्या कंपन्या किंवा गट संघ खरेदी करण्यासाठी बोली प्रक्रियेचा भाग बनतात. २०२२ मध्ये, जेव्हा गुजरात टायटन्स आणि लखनऊ सुपरजायंट्स लीगचा भाग बनले, तेव्हा बीसीसीआयच्या खात्यात १२५०० कोटी रुपये जमा झाले.

# भारत अंतिम फेरीत

- चीनला ७-0 ने नमवलं
- आशिया हॉकी कप स्पर्धा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताने आशिया हॉकी कप २०२५ स्पर्धेत कमाल केली आहे. एकही सामना न गमावता अंतिम फेरी गाठली आहे. भारताने नवव्यांदा आशिया कप स्पर्धेची अंतिम फेरी गाठली आहे. आशिया कप स्पर्धेत सर्वाधिक वेळा अंतिम फेरी गाठण्याचा मान देखील टीम इंडियाला मिळाला आहे.




सुपर ४ फेरीतील तिसऱ्या सामन्यात भारत आणि चीन हे संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात भारताने चीनला डोकं वर काढूच दिलं नाही. भारताने सुरुवातीपासूनच या सामन्यावर पकड मिळवली होती. पहिल्या सत्रात शिलानंद लाक्राने ३.३८ व्या मिनिटाला पहिला गोल केला. त्यानंतर ६.२६ व्या मिनिटाला भारताला पेनल्टी कॉर्नर दिलप्रीत सिंगने त्याचे गोलमध्ये रूपांतर केले. ७.५१ व्या मिनिटाला भारताने पुन्हा एकदा पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर केले. राजकुमार पाल ३६.१६ व्या मिनिटाला याने मैदानी गोल मारला आणि ४-० ने आघाडी मिळवली. त्यानंतर ३८ व्या मिनिटाला सुखजीतने पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर केले आणि चीन पूर्णपणे बॅकफूटवर गेला.

शेवटच्या सत्रात चीन एक गोल मारण्यासाठी धडपड करत राहिला. पण त्यांना काही संधी मिळाली नाही भारताने शेवटच्या सत्रातील ४५ व्या आणि ४९ व्या मिनिटाला गोल मारला. यासह सामन्यात ७-० ने आघाडी घेत सामना जिंकला. यासह भारताने अंतिम फेरीत धडक मारली असून आता दक्षिण कोरियाशी सामना होणार आहे. दक्षिण कोरियाने या स्पर्धेत सर्वाधिक वेळा जेतेपदाचा मान मिळवला आहे. त्यामुळे भारताला अंतिम सामन्यात कडवं आव्हान असणार आहे. विशेष म्हणजे जेतेपद मिळवणाऱ्या संघाला थेट हॉकी वर्ल्डकप स्पर्धेचं तिकीट मिळणार आहे. त्यामुळे या सामन्यातील विजय भारतासाठी खूप महत्त्वाचा आहे. भारतीय संघाने नवव्यांदा आशिया कपच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. आता चौथ्यांदा ट्रॉफी जिंकण्यासाठी दक्षिण कोरियाशी स्पर्धा करेल.

भारताने साखळी फेरीतील पहिल्या सामन्यात चीनला ४-३ ने पराभूत केले. दुसऱ्या सामन्यात जापानला ३-२ ने मात दिली. तिसऱ्या सामन्यात कझाकिस्तानचा १५-० ने विक्रमी पराभव केला. त्यानंतर सुपर ४ फेरीत पहिला सामना दक्षिण कोरियाशी झाला. हा सामना २-२ असा बरोबरीत सुटला. दुसऱ्या सामन्यात मलेशियाला ४-१ ने नमवलं. सुपर ४ फेरीतील शेवटच्या सामन्यात चीनला ७-० ने नमवलं.

# पोलीस निरीक्षक सुभाष पुजारी यांनी थायलंडमध्ये फडकवला तिरंगा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

५७ वी एशियन बॉडी बिल्डिंग अँड फिजिक्स स्पोर्ट्स चॅम्पियनशिप २०२५ थायलंड (बँकॉक) या ठिकाणी झालेल्या स्पर्धेमध्ये बॉडी बिल्डिंग स्पर्धेमध्ये सुभाष पुजारी यांनी गोल्ड मेडल मिळवून देशाचे नाव उंचावून भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवला.




सुभाष पुजारी हे या स्पर्धेसाठी दररोज सहा तास मिस्टर ऑलिम्पिया सुनीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत होते. या स्पर्धेसाठी २६ देशातील ३४० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. सुभाष पुजारी यांनी आतापर्यंत १३ इंटरनॅशनल मेडल मिळवलेले आहेत. या स्पर्धेसाठी त्यांना मिलिंद भारंबे पोलीस आयुक्त नवी मुंबई, श्रीकांत पाठक सह पोलीस आयुक्त ठाणे शहर, प्रीती टिपरे पोलीस अधीक्षक डायल ११२ नवी मुंबई, रागिणी पुजारी, आनंद गुप्ता व विवेक गुप्ता संचालक गॅम्प्रो ड्रिलिंग कंपनी खालापूर राइनोमाइट क्लिनिक अंधेरीचे डॉ. कनिष्क जैन व डॉ. असीम माथन, सुदर्शन खेडकर, ऋषी पेणकर विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या या यशाबद्दल रश्मी शुक्ला, पोलिस महासंचालक, मिलींद भारंबे पोलीस आयुक्त नवी मुंबई, निखिल गुप्ता अप्पर पोलीस महासंचालक, श्रीकृष्ण प्रकाश अप्पर पोलीस महासंचालक, गुप्ता अपर पोलीस महासंचालक, अभिषेक त्रिमुखे विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्यासह पोलीस खात्यातील वरिष्ठ अधिकारी व सहकारी मित्रांनी त्यांचे अभिनंदन केले.

# निवडक

## सबालेंका युएस ओपनची विजेती



**नवी दिल्ली :** शनिवारी रात्री आर्थर ॲश स्टेडियमवर झालेल्या अंतिम सामन्यात जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर असलेल्या आणि गतविजेत्या आर्यना सबालेंकाने अमांडा अनिसिमोवाला ६-३, ७-६ (७/३) असे हरवून सलग दुसरे यूएस ओपन विजेतेपद पटकावले. हे तिचे चौथे ग्रँड स्लॅम आहे. अंतिम सामन्यापूर्वी या दोन्ही खेळाडूंमध्ये नऊ सामने खेळले गेले. अनिसिमोवाने त्यापैकी सहा जिंकले आहेत.

## राष्ट्रीय ज्युनिअर लगोरी अजिंक्यपद स्पर्धेत मुले, मुलींचा महाराष्ट्र संघ विजेता



**नागोठणे :** ९ वी ज्युनिअर राष्ट्रीय लगोरी अजिंक्यपद स्पर्धा श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट सावर्डे चिपळूण येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेत मुले व मुलींचा महाराष्ट्र संघ विजेता ठरला. भारतातील १० राज्यातून मुलांचे व मुलींचे संघ स्पर्धेत सहभागी झाले होते. लगोरी टीम स्पर्धेत मुलांच्या गटात महाराष्ट्र संघाने सुवर्ण कामगिरी करीत विजेतेपद मिळविले, तर उपविजेतेपद तेलंगणा संघाने पटकावले, तर तृतीय स्थान तामिळनाडू व कर्नाटक संघाला मिळाले. मुलींमध्येही महाराष्ट्र संघाने सुवर्ण कामगिरी करीत विजेतेपद तर उपविजेतेपद तेलंगणा संघाने मिळविले तर तृतीय स्थान तेलंगणा व झारखंड संघाला मिळाले. मुलांमध्ये बेस्ट प्लेयर अवॉर्ड महाराष्ट्र मधील तन्मय पाटील याला तर मुलींमध्ये तेलंगणा मधील एम. श्रावंती यांनी पटकावले. टार्गेट लगोरी प्रकारात मुलांच्या गटात झारखंड संघाला विजेते पद, मध्यप्रदेश संघाला उपविजेतेपद, तर तृतीय स्थान दादरा-नगर हवेली व आंध्रप्रदेश संघाने मिळवले तर मुलींच्या गटामध्ये मध्यप्रदेश संघाला विजेतेपद, तामिळनाडू संघाला उपविजेतेपद तर तृतीय स्थान पाँडिचेरी व मुंबई संघाने पटकावले.

### मुक्त विद्यापीठ माजी विद्यार्थी संघातर्फे

## राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघाच्या पाचवा वर्धापन दिनानिमित्त राज्यस्तरीय निबंधलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेसाठी निबंध पाठविण्याची अंतिम मुदत १५ सप्टेंबर पर्यंत आहे. निबंध लेखन स्पर्धेसाठी मुक्त विद्यापीठामुळे शिक्षणाच्या खुल्या झालेल्या संधी, मुक्त विद्यापीठातून घेतलेल्या शिक्षणाची म झ्या दैनंदिन जीवनातील उपयुक्तता, ज्ञानगंगा घरोघरी नेणारे मुक्त विद्यापीठ, मुक्त विद्यापीठातून प्रौढांच्या शिक्षणाची स्वप्नपूर्ती, महिलांच्या सबलीकरणात मुक्त विद्यापीठाचे स्थान आणि मुक्त व दूरस्थ शिक्षणामधील कृत्रिम बुद्धिम त्तेचा वापर (ए.आय) असे सहा विषय आहेत. स्पर्धेसाठी केवळ मराठी भाषेतून लिहिलेले निबंधच स्वीकारले जातील. स्पर्धेसाठीचा निबंध हा मा. अध्यक्ष, माजी विद्यार्थी संघ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक, पिन ४२२२२२ या पत्त्यावर बंद पाकिटातून टपालाने अथवा alumniycmou@ycmou.ac.in या ईमेल आयडीवर १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत पाठवावेत.

## गणेश दर्शन स्पर्धा २०२५




- नेरळमधील भाऊ क्षीरसागर आणि बंडू क्षीरसागर यांच्या घरातील गणपती बाप्पा. यावर्षी क्षीरसागर बंधु यांना घरचा गणपती बाप्पाच्या मखर सजावट स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला.



- श्री. जितेंद्र रामदास पाटील, मु. बहिरोळे, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची मूर्ती. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर )



- प्रल्हाद गोपाळ घरत यांच्या नवा पाडा (उरण) येथील निवासस्थानात विराजमान करण्यात आलेली गणरायाची सुबक सुंदर मूर्ती. (छायाचित्र - अशोक म्हात्रे)



- स्वरा, पूर्वा, कस्तुरी, सार्थक व काव्य यांच्या चिरनेर (कातळपाडा) येथील निवासस्थानात विराजमान करण्यात आलेली कृष्णरूपी गणरायाची शाडू मातीची सुबक, सुंदर मूर्ती व साजेशा देखाव्याची आकर्षक सजावट. (मूर्तिकार- भाई चौलकर )



- करमेळे परिवार, मु. कातळपाडा, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची सुबक मूर्ती व सजावट. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर)



- मु. चोंढी, ता. अलिबाग येथील कातुर्डे परिवाराची आकर्षक सजावट केलेली सुबक श्री. गणेश मूर्ती. (छायाचित्र - अब्दुल सोगावकर )



- श्री. दिलिप मोंढे, मु. मुनवली, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची मूर्ती. ( छायाचित्र- अब्दुल सोगावकर )



- श्री. अविनाश सीताराम म्हात्रे, मु. बहिरोळे, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची मूर्ती. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर)



- श्री. संतोष बांद्रे, मु. मुनवली, ता. अलिबाग यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाची मूर्ती. (छायाचित्र- अब्दुल सोगावकर )

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)